दैनिक
अन्यायाचा प्रतिकार
# रायगड नगरी
महाराष्ट्राचा बुलंद आवाज..
मुख्य संपादक : सुनिल पोतदार
● वर्ष १५ वे ● अंक ३१८ ● MAHMAR/2006/17212 ● रायगड ● गुरुवार दि.११ फेब्रुवारी २०२१ ● किंमत १ ₹ www.raigadnagari.com

# सरपंच, उपसरपंच निवडणुकीतही भाजप नंबर वन



**दै.रायगड नगरी । पनवेल**

जानेवारी २०२१ मध्ये झालेल्या ग्रामपंचायतीच्या सार्वत्रिक निवडणुकीच्या अनुषंगाने या ग्रामपंचायतीच्या सरपंच व उपसरपंचाची निवडणूक आज झाली असून यामध्येही लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली भाजपाने विरोधकांना धूळ चारत बाजी मारली. त्यामुळे पुन्हा एकदा भाजपच नंबर वन असल्याचे सिद्ध झाले.

मागील महिन्यात विविध ग्रामपंचतीच्या सार्वत्रिक निवडणुकी पार पडल्या. या निवडणुकीत माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली भारतीय जनता पार्टीने घवघवीत यश संपादन करीत नंबर वन कामगिरी केली. विश-षतत्त्वाने अनेक वर्षांपासून शेकापक्षाच्या ताब्यातील ग्रामपंचायत भाजपच्या शिलेदारांनी काबीज करत या निवडणुकीत जोरदार मुसंडी मारत शेकापसह महाविकास आघाडीला चारी मुंड्या चित केले.

पालीदेवद ग्रामपंचायतीच्या सरपंचपदी योगिता राजेश पाटील, उपसरपंचपदी अशोक पाटील निवडून आले आहेत. या ग्रामपंचायतीत १२ सदस्य भाजपचे असताना १३ मते त्यांना पडली. त्यामुळे शेकापचा एक मत फुटून तो भाजपला मिळाला. त्यामुळे शेकापच्या गोटात मोठी खळबळ माजली. वाजे, खैरवाडी, केवाळे, उमरोली, आकुर्ली, सावळे, वारदोली ग्रामपंचायत सरपंच उपसरपंच निवडणूक बिनविरोध झाली. वाजे ग्रामपंचायतीच्या सरपंचपदी अंजली राजेंद्र भालेकर, उपसरपंचपदी रेवण आत्माराम पाटील, खानाव ग्रामपंचायतीच्या सरपंचपदी जयश्री शशिकांत दिसले, उपसरपंचपदी बाळाराम कोंडू पाटील, आकुर्ली सरपंचपदी भारती सचिन पाटील, उपसरपंचपदी सत्यवान लक्ष्मण धरणेकर, उमरोली सरपंचपदी कमला बळीराम मढवी, उपसरपंचपदी रोशन शांताराम पोपेटा, वारदोली सरपंचपदी संगिता बाळू भूतांबरा, उपसरपंचपदी सविता संतोष पाटील, केवाळे सरपंचपदी रेणुका अशोक गायकर, उपसरपंचपदी कांचन परशुराम पालकर, वाकडी सरपंचपदी कुंदा बाळू पवार, उपसरपंचपदी अरुण नरेश पाटील, खैरवाडी सरपंचपदी रजनी गोमा ढुमणे, उपसरपंचपदी हनुमान खैर, सावळे सरपंचपदी प्रशांत नरेश माळी, उपसरपंचपदी कांता वसंत कांबळे, देवळोली सरपंचपदी काजल मंगेश पाटील, पोसरी ग्रामपंचायतीच्या सरपंचपदी भावना विशाल जोशी तर उपसरपंचपदी सतिश पाटील विराजमान झाले आहेत. या सर्व शिलेदारांचे माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत, उपाध्यक्ष संजय पाटील, सरचिटणीस राजेंद्र पाटील, महिला मोर्चाच्या तालुकाध्यक्षा रत्नप्रभा घरत यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते, ग्रामस्थांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीकरिता शुभेच्छा दिल्या.

# नरेंद्र मोदी नटसम्राट आहेत, त्यांनी सिनेमात जावं : आ.नाना पटोले



**दै.रायगड नगरी । मुंबई**

पंतप्रधान नरेंद्र मोदी मंगळवारी राज्यसभेला संबोधित केले. काँग्रेसच्या गुलाम नबी आझाद यांच्यासह ४ खासदारांचा २ फेब्रुवारी रोजी संसदेतला शेवटचा दिवस आहे, त्यांना निरोप देताना नरेंद्र मोदींनीकाँग्रेसचे ज्येष्ठ नेते गुलाम नबी आझाद यांचं कौतुक केले. त्याचसोबत गुलाम नबी आझाद यांच्यासोबत घडलेल्या एका घटनेवरून नरेंद्र मोदी सभागृहात भावूक झाल्याचे दिसून आले. त्यांना यावेळी अश्रू अनावर झाले. यावरुन शिवसेनेचे नेते संजय राऊत, राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह विविध पक्षांच्या नेत्यांनी नरेंद्र मोदींवर निशाणा साधला. याचदरम्यान आता काँग्रेसचे नवनियुक्त महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी देखील नरेंद्र मोदींवर टीका केली आहे.

नाना पटोले एका मराठी वृत्तावाहिनीशी संवाद साधताना म्हणाले की, नरेंद्र मोदी यांची तुलना नटसम्राट यांच्यासोबत केली तर वावगं ठरणार नाही. त्यांना नटसम्राट बनायचं असेल तर त्यांनी सिनेमात जावं. राज्यसभेत नरेंद्र मोदींची नौटंकी आपण पाहिली, अशी खोचक टीका नाना पटोले यांनी केली आहे. जे अश्रू होते ते मगरीचे अश्रू होते, असा टोला देखील नाना पटोले यांनी लगावला आहे.

तत्पूर्वी, गुजरातच्या पर्यटकांवर जेव्हा दहशतवाद्यांनी हल्ला केला होता, तेव्हा सर्वात आधी गुलाम नबी आझाद यांचा फोन मला आला, तो फोन फक्त सूचना देण्यासाठी नव्हे तर त्यांच्या डोळ्यातील अश्रू थांबत नव्हते, त्यावेळी मी गुजरातचा मुख्यमंत्री होतो, आपल्या कुटुंबातील सदस्यांची जशी चिंता असले तशी चिंता गुजरातच्या लोकांबद्दल आझाद यांना होती, असं नरेंद्र मोदी यांनी सांगितले.

तसेच या हल्ल्यात ८ लोक मारले गेले होते, तेव्हा प्रणब मुखर्जी संरक्षण मंत्री होते, मी त्यांना या पर्यटकांचे मृतदेह गुजरातमध्ये आणण्यासाठी संरक्षण खात्याच्या एअरप्लेनची मागणी केली, प्रणब मुखर्जी यांनी सांगितले चिंता करू नका, रात्री खूप उशीर झाला होता, पुन्हा गुलाम नबी आझाद यांचा मला फोन आला. ते एअरपोर्टवर होते, आपल्या कुटुंबाप्रमाणे त्यांची त्या सदस्यांची काळजी घेतली...अशी चिंता....म्हणत ते वाक्य नरेंद्र मोदी पूर्ण करू शकले नाहीत, त्यांना गहिवरून आल्याचे दिसून आले होते.

## रडण्यात नरेंद्र मोदींचा विक्रम : खा.संजय राऊत

संसदेत मंगळवारी झालेल्या प्रकारावर इतकेही भावनिक होण्याची गरज नव्हती. अशाप्रकारे अश्रूंचा बांध फुटणे हे काही नवीन नव्हते. देशाचे पंतप्रधान अशाप्रकारे संसदेत रडतात, हा एक प्रकारचा विक्रम आहे. कारण आतापर्यंत ५ ते ७ वेळा नरेंद्र मोदी भावनिक झाले आहेत, असं संजय राऊत यांनी सांगितले. यासोबतच दिल्लीत मागील अनेक दिवसांपासून शेतकरी आंदोलन करतायत, अनेक शेतकरी यामध्ये मृत्युमुखी पडले, तेव्हा नरेंद्र मोदींचे अश्रू बाहेर पडले नाहीत, अशी टीकाही संजय राऊत यांनी केली आहे.

## संक्षिप्त...

### म्हाडाची बंपर लॉटरी लवकरच; ७,५०० जणांचं घर घेण्याचं स्वप्न होणार पूर्ण

**दै.रायगड नगरी । मुंबई**

मायानगरी मुंबईत आपल्या स्वत:चं हक्काचं घर असावं, असं प्रत्येकाचं स्वप्न असतं. स्वत:चं घर घेणाऱ्यांसाठी आता एक खूशखबर आहे. कारण लवकरच म्हाडाच्या घरांची लॉटरी असून ७ हजार ५०० जणांचं घर घेण्याचं स्वप्न पूर्ण होणार आहे. म्हाडाच्याकोकण मंडळाच्या घरांच्या सोडतीसह मुंबई मंडळाच्या सोडतीची तयारी सुरू आहे अशी माहिती गृह निर्माणमंत्री जितेंद्र आव्हाड यांनी दिली आहे. म्हाडाकडे जमीन नाही. विकासकांसोबत संयुक्त भागीदार करून घरे उपलब्ध करून देण्यात येणार आहेत, असेही त्यांनी म्हटलं आहे. म्हाडा पत्रकार संघाच्या आठव्या वर्धापनदिनानिमित्ताने म्हाडा मुख्यालयात आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. ते म्हणाले, जमीन अधिग्रहण आणि गृहसाठा यावर लक्ष्य केंद्रित केले जाणार आहे. भागीदारीत गृहसाठा आणि भूखंड अधिग्रहणातून घरे उपलब्ध केली जातील. म्हाडातील कार्यप्रणाली सुलभ करण्याच्या प्रयत्नास यश आलेले नाही, ही खंतदेखील आव्हाड यांनी व्यक्त केली आहे. या सोडतीतील घरं ही ठाणे, कल्याण आणि नवी मुंबईतील आहेत. कोकण मंडळाची सोडत ही लॉकडाऊनमुळे थोडी लांबणीवर गेली होती. मात्र आता तयारी सुरू झाली आहे.

# अवजड वाहनांच्या वाहतुकीमुळे साळाव पूलाला धोका?

## आंबेतची पुनरावृत्ती नको : नागरिकांची भावना



**दै.रायगड नगरी । कोर्लई**

गेल्या अनेक वर्षांपासून मुरुड, रोहा व अलिबाग तालुक्याला जोडणारा दुवा असलेल्या साळाव पूलावरुन होणा-या अवजड वाहनांच्या वाहतुकीमुळे प्रश्नचिन्ह निर्माण झालेले असून याठिकाणी आंबेतची पुनरावृत्ती नको. अशी भावना नागरिकांतून व्यक्त केली जात आहे.

राज्याचे माजी मुख्यमंत्री बॅ.ए.आर. अंतुले यांच्या प्रयत्नातून चाळिस वर्षांपूर्वी अलिबाग, रोहा व मुरुड या तीन तालुक्यांना जोडणा-या या पूलाची उभारणी करण्यात आली. गेल्या ३५ वर्षांपासून या पुलामुळे येथील पर्यटन व्यवसायाला खऱ्या अर्थाने चालना मिळाली. मुरुड -जंजिरा, नांदगाव येथील सुप्रसिध्द सिद्धिविनायक देवस्थान, बिर्लामंदीर, फणसाड अभयारण्य, काशिद बीच वर शनिवार रविवार व सुटीच्या दिवशी मोठ्या प्रमाणावर पर्यटक भेट देत असतात. देश-विदेशातील पर्यटक देखील या ठिकाणी आवर्जून येत असतात.

गेल्या अनेक वर्षांपासून साळाव पूलावरुन होणा-या अवजड वाहतुकीमुळे प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. या पुलाला ३५ वर्षे झाली आ-हेत. मागील काळात पुलाला बार्जच्या बसलेल्या धडकेने नागरिकांमध्ये भितीचे वातावरण होते. ..../२

# पेण तालुक्यातील ७ ग्रामपंचायत सरपंच निवडणुका ; पेणमध्ये ६ ग्रामपंचायत सरपंच बिनविरोध



**दै.रायगड नगरी । पेण**

पेण तालुक्यातील ७ ग्रामपंचायतींच्या सरपंच व उपसरपंच पदासाठी आज निवडणुका पार पडल्या त्यामध्ये ६ ग्रामपंचायतींचे सरपंच बिनविरोध निवडून आले असून जोहे ग्रामपंचायतीत नागरीकांचा मागास प्रवर्ग महिला करीता सरपंच पदासाठी जयवंती मधूकर पाटील यांच्या विरोधात लक्ष्मी गोपीनाथ मोकल यांनी अर्ज दाखल केला असता यामध्ये झालेल्या निवडणुकीत जयवंती पाटील यांना ७ तर लक्ष्मी मोकल यांना ४ मते मिळाली असल्यांने जयवंती पाटील या निवडून आल्या असल्याचे अध्यासीय अधिकारी रत्नाकांत सुर्यवंशी यांनी जाहीर केले तर उपसरपंचपदी गणेश मणिराम घरत बिनविरोध निवडून आले आहेत.

त्याच बरोबर वाकरूळ ग्रामपंचायतीच्या सर्वसाधारण सरपंच पदासाठी गणेश भिवा गायकर तर जोमा विष्णू लेंडे हे उपसरपंचपदी विराजमान झाले आहेत. तसेच आंबेघर ग्रामपंचायत मध्ये अनुसूचित जमाती महिला करीता सरपंच जोत्स्ना हरेष विर तर उपसरपंच मंगेश भिवसेन काईनकर बिनविरोध झाले असून कामार्ली ग्रामपंचायतीत ..../२

# लोकलमध्ये सापडलेल्या बॅगेतील १ लाख १० हजाराचा ऐवज उप निरीक्षक रेणू पटेल यांनी दिला परत



**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल रेल्वे स्टेशनवर लोकल मध्ये सापडलेल्या बॅगे-तील रोख ५० हजार रुपयांसह १ लाख १० हजाराचा ऐवज रेल्वे सुरक्षा बलाच्या उप निरीक्षक रेणू पटेल यांनी लोको पायलट भुपेश कुमार यांना परत दिल्यावर त्यांच्या डोळ्यात आनंदाश्रू उभे राहिले त्यांनी रेल्वे सुरक्षा बलाच्या कर्मचाऱ्यांचे आभार मानून धन्यवाद दिले.

बुधवार १० फेब्रुवारी रोजी सकाळी ८ वाजता पनवेल स्टेशनवर फलाट क्रमांक ४ वर आलेल्या लोकल मध्ये रेल्वे सुरक्षा बलाच्या उप निरीक्षक रेणू पटेल, हवालदार सतीशकुमार आणि महिला हवालदार भगवती आलेली लोकल चेक करीत असताना कोच क्रमांक १०४२सी मध्ये ब्राऊन रंगाची चामड्याची बॅग सापडली. त्याबाबत चौकशी केलीयसता डब्यातील प्रवाश्यांनी आपली नाही सांगितल्याने स्टेशन वरील कार्यालयात आणून तप-ासली असता त्यामध्ये ५० हजार रुपये रोख, रेडिमी MI -१० मोबाईल किमत ३५ हजार, रेडिमी K 20 PRO किमत ..../२

# दिघी सरपंचपदी विपुल गोरिवले तर उपसरपंचपदी गोपाळ मेंदाडकर

## दिघीमध्ये शिवसेनेचे वर्चस्व कायम



**दै.रायगड नगरी । दिघी**

दिघी पोर्ट मुळे नावाजलेल्या श्रीवर्धन तालुक्यातील दिघी ग्रामपंचायत च्या सरपंचपदी विपुल गोरिवले हे विराजमान झाले. तर उपसरपंचपदी गोपाळ मेंदाडकर यांची निवड करण्यात आली. बुधवार, ता. १० फेब्रुवारी रोजी झालेल्या बैठकीत मंडळाधिकारी मोरे यांनी सरपंच व उपसरपंच पदाची घोषणा केली.

श्रीवर्धन तालुक्यातील दिघी या ग्रामपंचायतीची सार्वत्रिक निवडणुकीसाठी १५ जानेवारी रोजी मतदान करण्यात आले. या ग्रामपंचायत मधील पाच प्रभागातुन १३ सद्यस्य निवडून आले आहेत. राजकीय दृष्टीने प्रतिष्ठित अशा दिघी ग्रामपंचायतच्या सरपंच, उपसरपंच पदासाठी काल घेण्यात आलेल्या निवडणुकीत विपुल गोरीवले व देविदास कावळे या दोन सदस्यांनी सरपंच पदासाठी अर्ज दाखल केला होता. यातील विपुल गोरीवले यांना बहुमत मिळाले आहे. तर उपसरपंच पदासाठी कल्पना कदम, गोपाळ मेंदाडकर व निर्मला कांदेकर या तीन सदस्यांनी अर्ज दाखल केला होता. तांत्रिक बाबींच्या कारणास्तव निर्मला कांदेकर यांचा अर्ज बाद करण्यात आला. उर्वरित दोन सदस्यांपैकी निवडणूकीत मेंदाडकर यांना बहुमत मिळाले असून दिघी ग्रामपंचायत च्या सरपंचपदी विपुल गोरीवले व उपसरपंच पदी गोपाळ मेंदाडकर निवडून आल्याचे पीठासीन अधिकारी सुनील मोरे यांनी घोषणा केली. या निवडणूक कार्यक्रमाला नायब तहसीलदार व्ही. एन. दुबे, प्रशासक किशोर नागे व सचिव म्हणून एम. एच. भालदार यांनी काम पाहिले. यावेळी ही दिघी ग्रामपंचायत मध्ये शिवसेनेने आपले वर्चस्व कायम राखले आहे.

सरपंच व उपसरपंचपदी निवड झाल्यानंतर त्यांचे माजी आमदार तुकाराम सुर्वे, उपजिल्हाप्रमुख श्यामकांत भोकरे, सुकुमार तोंडलेकर, सुजित तांदलेकर, प्रतोष कोलथरकर, जनार्दन गोवारी, संदेश म्हसकर, नंदकिशोर भाटकर, दामोदर पाटील यांसह गावातील अनेक मान्यवरांनी नवनिर्वाचित सरपंच, उपसरपंच व सद्यस्यांचा सन्मान करून शुभेच्छा दिल्या.

# अल्प कोट्यामुळे रोह्यात वाहन परवाने रखडले, नागरिक संतप्त

**दै.रायगड नगरी । रोहा**

वाहन परवाने काढण्यासाठी पेण आरटीओने कॅम्पनिहाय दिलेला कोटा हा अल्प असल्याने शेकडो लोकांचे वाहन परवाने रखडले आहेत. त्यामुळे रोहा तालुक्यासह जिल्ह्यातील नवीन परवाना घेणारे वाहनचालक नागरिक संतप्त झाले आहेत. पेण आरटीओने दिलेला कोटा पुर्ववत करावा अशी मागणी नागरिकांतून होत आहे.

लॉकडाऊननंतर आता दोन महिने वाहन परवाना काढण्यासाठी रोह्यातील नागोठणे, चणेरा,तांबडी कोलाड, धाटाव, विभातून नागरिक रोह्यात खाजगी एजंकडे येतात. काही लोक स्वतः ऑनलाईन लायसन्स काढण्याचा प्रयत्न करतात. मात्र पेण आरटीओने मात्र कोटा निश्चित करून दिल्याने तारखेला निश्चित केलेल्या वेळी सकाळी ८ ते ८:१५ वेळेत फक्त १ ते २ लोकांचे ओटीपी स्वीकारले जात आहेत. त्यामुळे शेकडो नागरिकांमध्ये नाराजीचे सुर उमटत आहेत.

महाराष्ट्र शासनाच्या मुंबई येथील परिवहन आयुक्त कार्यालयाकडून सर्व प्रादेशिक व उपप्रादेशिक परिवहन अधिकारी यांना नवीन नियमावलीचे उपाययोजना करण्यासंदर्भात सप्टेंबर २०२० मध्ये पत्रक काढण्यात आले होते. या पत्राद्वारे शिकाऊ व पक्की अनुज्ञप्ती मिळवण्याकरीता उशीराने अपॉईटमेंट मिळत असल्याची बाब नेहमी निदर्शनास आल्याने. शिकाऊ व पक्की अनुज्ञप्तीकरीता २ ते ३ दिवसापेक्षा जास्त कालावधी लागू नये असे निर्देश देण्यात आले आहेत.

यामध्ये शिकाऊ व पक्की अनुज्ञप्राप्तीकरणाचा कोटा कोविडपुर्व कोट्याप्रमाणे पुर्ववत करण्यात यावे, प्रत्येक शनिवारी व रविवारी शिकाऊ व पक्की अन-ुज्ञप्तीची चाचणी घेण्यात यावी. अशा सुचना देण्यात आल्या आहेत. महत्वाचे म्हणजे या सुचनांचे पालन पेण आरटीओकडून होत नाहीत. महिन्यातून एकदा तारीख दिली कि त्यातील शेकडो नागरिकांपैकी दोन ते चार नागरिकांचे ओटीपी येऊन फिक्स होते. तर कित्येकांची निराशा होते. त्यामुळे रोह्यासारख्या वाढत्या लोकसंख्येच्या शहरात कित्येक लोकांचे वाहन परवाने काढण्यापासून राहिले आहेत. याशिवाय मार्च २०२० पासून कोरोनासारख्या महमारिच्या संकटात गेली आठ महिने परवाने काढणे बंद असल्याने व कित्येक लोकांना तारीख घेता न आल्याने फार मोठी निराशा वाहन परवाना काढण्यासंदर्भात रोह्यातील नागरीकांची झाली आहे. आता वाढीव कोटा पुर्ववत करुन अजून अधिकचा कोटा आरक्षित करावा अशी मागणी रोह्यातील नागरिकांतून होत आहे. असे न झाल्यास रायगड जिल्ह्यातील वाहनधारक यासंबंधी पालकमंत्री ना.अदिती तटकरे यांची ..../२

# महासंकटाच्या शेवटाकडे...

करोनाकाळ आता खरेच उतरणीला लागला, असे वाटावे अशाच बातम्या जगभरातून येत आहेत. गेल्या वर्षभरात असे आतून बरे वाटावे, असे प्रसंग फारच विरळ आले. त्यामुळे आता करोना आटोक्यात येत आहे, ही वार्तादेखील कितीतरी सुखावणारी आहे. जगात दहा कोटींहून अधिक रुग्ण व २३ लाख मृत्यू, तर भारतात हेच प्रमाण एक कोटी व दीड लाख, हे आकडे मात्र काही पाठ सोडायला तयार नाहीत. साहजिकच करोना उतरणीला लागला, या सुखालाही ही अशी व्यथेची किनार आहे. सुरुवातीला एक रुग्ण आढळला तेव्हा भयकंप उठला. आज वर्षभरानंतर हीच संख्या फक्त भारतातच कोटीची उड्डाणे घेत आहे. लस उपलब्ध झाल्याने या महामारीच्या भीतीची तीव्रता निश्चितच कमी झाली आहे. वर्षभर एका अनामिक भीतीच्या सावटाखाली काढल्यानंतर हळूहळू लोकही करोनाला सरावले. सरकारी पातळवरील धोरणात्मक गोंधळ कमी झाला. या विकाराची दहशत, भीती कमी झाली. लोक सजग झाले. रामबाण उपाय अद्याप सापडला नसला तरी लसी आल्या. लसीकरण सुरू झाले. याच दरम्यान रुग्णांची संख्याही लक्षणीय घटू लागली. उपचाराधीन रुग्णही काही हजारांवर आले. मृत्युदर घटला. ही सारीच समाधानकारक उतरंड करोनाचा अंत जवळ आल्याचा जणू संदेश देत आहेत. करोनाकाळात पॉझिटिव्ह व निगेटिव्हच्या परिणामांची व्याख्याच बदलून गेली. करोना संकट कमी होत असताना येणाऱ्या अनुभवांचे संचितही असेच निराळे आहे. हे संकट कमी होत आहे, याचे समाधान आहेच; पण समाधानाची पुढची पायरी आनंदात असते, ती गाठण्यासाठी मात्र अद्याप काही काळ वाट पाहावी लागणार. ती वेळ लवकर यावी, असे वाटत असेल, तर गेले काही महिने जी काळजी घेतली तशीच यापुढेही आवश्यक ठरेल. करोनाला हरवायचे वगैरे बोलण्यापुरते ठीक, पण त्यावर मात करायची तर अखंड सावधगिरी व काळजीला पर्याय नाहीच, हे सर्वांना वारंवार शिकायला मिळाले. या सकारात्मक वातावरणात लसीकरणाचा पाच लाखांचा टप्पा राज्याने नुकताच ओलांडला. तरीही लसीकरणात महाराष्ट्राची वाटचाल इतर राज्यांच्या तुलनेत कमालीची संथ आहे. राजस्थान, बिहार, गुजरात, ओडिशा, मध्यप्रदेश आदी राज्यांनी लसीकरणाचे पंचाहत्तर टक्क्यांहून अधिक उद्दिष्ट पूर्ण केले आहे. महाराष्ट्राला पन्नास टक्के जेमतेम लक्ष्य गाठता आले आहे. येत्या दहा–बारा दिवसांत ही प्रक्रिया पूर्ण करावयाची असल्याने लसीकरणाचा वेग आता वाढवावा लागेल. सर्वांना लस उपलब्ध व्हायची असेल तर आरोग्य कर्मचारी व यातील कार्यकर्ते, स्वयंसेवक यांचे लसीकरण लवकरात लवकर पूर्ण करावे लागेल. सुदैवाने, लसीकरणामुळे त्रास झालेल्यांचे प्रमाण नगण्य आहे. साहजिकच आम जनतेतील त्याविषयीचा संभ्रम दूर झाला असणार. १३५ कोटी लोकसंख्येच्या खंडप्राय देशात सर्वांना लस मिळणे, हीच महाकठीण बाब. शिवाय ती सर्वांना देणे, त्याची सायकल पूर्ण होऊन त्यात यश येणे हे आणखी एक आव्हान. पण हे आव्हान सरकारसह आरोग्य यंत्रणांनीही निर्धाराने पेलले आहे. भारतासारख्या विकसनशील देशात करोनामुळे हाहाकार माजेल, ही ट्रम्प महाशयांची भविष्यवाणी खोटी ठरविण्याचे श्रेय निश्चितच या यंत्रणांना द्यावे लागेल. त्यांच्या अथक प्रयत्नांमुळेच करोनाला आळा घालण्यात यश आले आहे. बाधित रुग्णांची दैनंदिन संख्याही वेगाने घटत आहे. या आनंदवार्तांमध्येही महाराष्ट्राने दखल घ्यावी अशी चिंतेची बाब आहे. देशातील एकूण उपचाराधीन रुग्णांपैकी केरळमध्ये ४५ टक्के, तर महाराष्ट्रात २५ टक्के रुग्ण आहेत. आजही राज्यातील रुग्णांची संख्या ही देशाच्या वीस टक्क्यांच्या आसपास असल्याने करोनाचा धोका कायम आहे, हे विसरता येत नाही. करोनाचा नवा अवतार आल्यानंतर अमेरिकेसहित विशेषत: युरोपात हाहाकार माजून नव्याने लॉकडाउन करावे लागले. सुदैवाने, हा नवा अवतार फारसा धोकादायक नसल्याचे आढळून आले. त्यामुळेच गेल्या काही दिवसांत जगभरात करोनाचे संकट कमी होत असल्याचे आकडे आहेत. अमेरिका, ब्राझील, मेक्सिको या देशातील मृत्यूचा आकडा सर्वाधिक आहे. पाठोपाठ भारताचाही क्रम लागतो. सावधगिरी म्हणून युरोपीय देशांना नव्याने प्रतिबंधात्मक आदेश जारी करावे लागले आहेत. भारतात त्या मानाने पुष्कळशी सवलत दिली गेली आहे. त्याचा सुदूर परिणाम दिसून भारतीय अर्थव्यवस्थेला चालना मिळाली आहे. केंद्रीय अर्थसंकल्पात आरोग्यासाठी भरीव तरतूद करून सरकारनेही अशा संकटांना प्रदीर्घ काळ भिडावे लागणार, याची जाणीव ठेवली आहे. विशेषत: आम जनतेतील भीती दूर होत आहे, ही सर्वांत समाधानाची बाब आहे. देशापुढील या अत्यंत भयावह अशा संकटाला तोंड देत भारतीय जनमानस कसोटीला उतरले आहे. हाच सामूहिक निर्धार यापुढेही राष्ट्र उभारणीच्या कामी यावा, ही अपेक्षा.

# तब्बल २९ तासानंतर आग विझविण्यास अग्निशामक दलाच्या जवानांना यश

**दै.रायगड नगरी । तळोजा**

तळोजा औधोगिक परिसरातील पडघे येथील नविन केमिकल झोनमध्ये मंगळवार दिनांक ९ फेब्रुवारी रोजी सकाळी ११वाजताच्या सुमारास अचनाकपणे एजिओक्रीस्ट ऑगनाईज प्लॉट. नं. ३४ या कंपनीला आग लागली होती. या कंपनीला लागलेल्या आगीने रौद्र रूप धारण केले होते. या आगीची झळ शेजारी असलेल्या स्टॅन्डी पॅक ऑईल कंपनी प्लॉट नं ३३, गौरी ॲसिड प्रा. लि. प्लॉट. नं. ३२, व शारदा फेब्रिकेशन प्रा लि प्लॉट. नं. ३५ या कंपन्यांना लागताच या चार हि कंपन्यांनी पेट घेतला. या चार हि कंपन्यांनी अग्नी तांडव केला. मंगळवारी दिनांक ९ फेब्रुवारी सकाळी ११वाजता लागलेली आग बुधवार दिनांक १० फेब्रुवारी दूपारी ३.३० वाजेपर्यंत पेटत होती. सायंकाळी ४ वाजता अग्निशामक दलाच्या जवानांना हि विझविण्यास यश आले. तब्बल २९ तासानंतर आग पूणपणे आटोक्यात येवून ती विझविण्यास यशस्वी झालो असल्याचे कबुली तळोजा अग्निशामक दलाचे अधिकारी आर. एन. फरांडे यांनी दिली



या मोहिमेत तळोजा अग्निशामक दल, नवी मुंबई अग्निशामक दल, रबाले एम.आय. डी.सी अग्निशामक दल, खारघर अग्निशामक दल, कळंबोली अग्निशामक दल, न्यू. पन–वेल व पनवेल अग्निशामक दल, अबंरनाथ एम.आय.डी.सी. अग्निशामक दल, व दिपक फरटिलायझर कंपनीचे अग्निशामक दल अशा एकूण १५ अग्निशामक गाड्या घटनास्थळी उपस्थित होत्या. तसेच आग विझविण्यासाठी ६०अग्निशामक दलाचे जवानांनी सहभाग दशविला होता. तब्बल २९ तासानंतर हा अग्नि तांडव विझविण्यासाठी सव अग्निशामक दलाच्या जवानांना शर्तीचे प्रयत्न करावे लागले.

आग लागण्याचे कारण अद्याप स्पष्ट झालेले नसून प्रथम दशनी या चार हि कंपन्यांमध्ये फक्त छोटे अग्निशामक चे बॉटल दिसून आले आहेत. तसेच इतर कोणतीही उपाययोजना आढळून आल्या नाहित. पुढील तपास केल्यानंतर अधिक गोष्टी स्पष्ट होतील. या कंपनीच्या इमारतीचे स्टक्चर ऑडीट केले आहे कि नाही हे पुढील तपासात स्पष्ट होईल. अशी वरील सव माहिती तळोजा अग्निशामक दलाचे अधिकारी आर.एन. फरांन्डे यांनी दिली आहे.

या आगीमध्ये एजिओक्रीस्ट ऑगनाईज व स्टॅन्डी पॅक ऑईल या दोन कंपन्या पूण पणे १००% जळून गेल्या आहेत. गौरीॲसिड हि कंपनी ४०% जळाली असून शारदा फेब्रिकेशन हि कंपनी २५% जळाली असून या दोन कंपन्या पूणपणे जळण्यापासून विचविण्यास यश आले आहे.

एजिओक्रीस्ट या कंपनीची पूर्ण इमारत १००% कोसळली आहे. तर स्टॅन्डी पॅक ऑईल कंपनीची इमारत पूण पणे ७०% जळून खाली कोसळली आहे. उर्वरित ३०% इमारतीचा भाग पूण जळून खाक झाला असून तो ही कोसळण्याची शक्यता आहे. त्यामुळे कंपनीतील आतील भागात जे ऑईलचे ड्रम आहेत त्यावरच हि इमारत कोसळली असल्याने त्या ड्रम पर्यत पाणी पोचत नसल्या कारणाने आग अजून पर्यत धूमधूमत आहे अशी माहिती तळोजा अग्निशामक दलाचे वरिष्ठ अधिकारी दिपक डोरगुडे यांनी दिली आहे.

ॲड.निलेश द.हातमोडे

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी सो यांचे कोर्टात

क्रिमिनल एम.ए.नं.७२४/२०२०

ने.ता.१५/०३/२१

श्री.काळुराम हरी घोडींदे
वय : ६३ वर्षे, धंदा : शेती
रा.मु.चिंध्रण, पो.देवीचापाडा,
ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार

विरुद्ध

ग्रामसेवक/ग्रामविकास अधिकारी
ग्रुप ग्रामपंचायत चिंध्रण
ता.पनवेल, जि.रायगड — सामनेवाला

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने असे कळविण्यात येत आहे की, अर्जदार यांची आई कै.देवकीबाई हरी घोडींदे दि.०७/०४/१९७९ रोजी मु.चिंध्रण, पो.देवीचापाडा, ता.पनवेल, जि.रायगड येथे मयत झालेले आहे. वरील अर्जदार श्री.काळुराम हरी घोडींदे यांची आई कै. देवकीबाई हरी घोडींदे यांचे मृत्यू नोंदणी करण्यासाठी व मृत्यू दाखला मिळण्यासाठी अर्ज दाखल केलेले आहे. तरी सदर अर्जाबाबत इतर कोणाचा हक्क अधिकार अथवा हितसंबंध अशी कोणत्याही प्रकारची तक्रार असल्यास तशी लेखी हरकत ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसाच्या आत या न्यायालयात दाखल करावी.

वरील पद्धतीची कोणतीही हरकत न दाखविल्यास सदरहू अर्जदारांच्या मागणीनुसार मृत्यू नोंद होवून मृत्यू दाखला देण्यात येईल. त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

येणेप्रमाणे ही जाहीर नोटीस आमच्या सहीनिशी व कोर्टाच्या शिक्क्यानिशी आज रोजी दि.१०/०२/२०२१ रोजी दिली.

सही/–
क.लिपीक
फौ.न्याया, पनवेल

(कोर्टाचा शिक्का)

सही/–
सहा. अधिक्षक
फौ.न्याया, पनवेल

## वाचकांना विनम्र सूचना

**दै.रायगड नगरी वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकूराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची दै.रायगड नगरी कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.**






# म्हसळा तालुक्यातील ग्रामपंचायतीमध्ये राष्ट्रवादी काँग्रेसचे वर्चस्व

**दै.रायगड नगरी । म्हसळा**

१५ जानेवारी २०२१मध्ये तालुक्यातील पाभरे,लिपणीवावे आणि केलटे ग्रुप ग्राम पंचायतीच्या संपन्न झालेल्या सार्वत्रिक निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेसने एक हाती सत्ता प्रस्थापित केली आसुन सरपंच पदाचे आरक्षण सोडती नंतर आज रोजी संपन्न झालेल्या सरपंच,उपसरपंच पदाची निवडणूक बिनविरोध होऊन ११ सदस्य संख्या असलेल्या पाभरे ग्राम पंचायत सरपंचपदाचे सर्वसाधारण जागेवर राष्ट्रवादी काँग्रेस पाभरे गण अध्यक्ष अनिल बसवत यांची सरपंच पदी तर उप सरपंच पदावर मझर काझी यांची बिनविरोध निवड झाली आहे.

लिपणीवावे ग्रुप ग्राम पंचायत सरपंचपद महिलांना राखीव जागा करिता श्रीमती रसिका वाघरे यांची सरपंच पदावर तर मारियम खारगाव येथील आकाश गोरीवले यांची उपसरपंच पदी नियुक्ती करण्यात आली. तालुक्यातील बिनविरोध सदस्य निवड झालेल्या केलटे ग्राम पंचायतीच्या सरपंच पदावर बोर्ले परिवाराने आपली छाप कायम ठेवली आसुन सर्वसाधारण आरक्षित असलेल्या सरपंच पदी गणेश सुरेश बोर्ले यांची सरपंच पदी तर उपसरपंच पदासाठी श्रीमती स्नेहाली शंकर पिचुरले यांची बिनविरोध निवड झाली.

नव्याने सरपंच,उपसरपंच पदावर स्थापित झालेल्या लोकप्रतिनिधी यांचे राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुका नेते अली शेट कौचाली, तालुका अध्यक्ष समीर बनकर,जिल्हा परिषदेचे सभापती बबन मनवे, तालुका सभापती उज्वला सावंत, उपसभापती मधुकर गायकर, माजी सभापती छाया म्हात्रे, प.स.सदस्य संदीप चाचले, माजी जिप सदस्या वैशाली सावंत, युवक अध्यक्ष फैसल गीते,युवक मतदारसंघ अध्यक्ष संतोष पाखड, ओबीसी सेल विभागीय अध्यक्ष गजानन पाखड, जेष्ठ नेते अंकुश खडस, व्यंकटेश सावंत, रामचंद्र बोर्ले आदी मान्यवरांनी शुभेच्छा देवुन अभिनंदन केले आहे. सरपंच, उपसरपंच निवडणूक कामी निवडणूक निर्णय अधिकारी म्हसळा तहसीलदार शरद गोसावी यांचे अधिकारात काम सुरळीत पार पडले.

म्हसळा तालुक्यात ग्राम पंचायत निवडणुकीत पाभरे,लिपणीवावे आणि केलटे ग्राम पंचायती मध्ये राष्ट्रवादी काँग्रेसला घवघवीत यश मिळाले असल्याने खासदार सुनिल तटकरे यांनी पालकमंत्री तथा श्रीवर्धन मतदार संघाच्या आमदार आदिती तटकरे,आमदार अनिकेत तटकरे यांच्या विकास निधींतुन वरील ग्राम पंचायतीना अनुक्रमे १५ आणि १०,१० लक्ष रुपयांचा विकास निधी घोषित करून पक्षाचे मार्फत सर्वांचे अभिनंदन केले आहे.

मा.बहिर साहेब

ॲड.अश्विन मोकल

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर यांचे कोर्टात

दि.चौ.अर्ज क्र.१२७/२०२१

नि.नं.८/ड

ने.ता.२५/०३/२१

श्रीमती.मनकरनाबाई शेषराव सगर
वय : ७१ वर्षे, धंदा : गृहिणी
फ्लॅट नं.बी/२०३, जीवधानी दिप अपार्टमेंट,
वसई, ता.वसई, जि.पालघर — अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे असे कळविण्यात येते की, कै.नरसिंग विठ्ठलराव सगर यांचे दि.०२/०१/२०२० रोजी बी–२०३, जीवधानी दिप अपार्टमेंट, वालीव, वसई, ता.वसई, जि.पालघर येथे अर्जदार यांच्या राहत्या घरी निधन झाले. त्यांच्या नावे मृत्यूसमयी नावे असलेली वरील अर्जदार यांना त्यांच्या मृत्यूपश्चात खालील मिळकतीसंबंधी वारसदाखला मिळण्यासाठी या मे.न्यायालयात अर्ज केलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

**१७–सुप्रभात सी.एच.एस., प्लॉट नं.सी/३९,**
**सेक्टर १२, खारघर, ता.पनवेल, जि.रायगड**

तरी सदरचे अर्जदार हे कै.नरसिंग विठ्ठल सगर यांचे कायदेशीर वारस आहेत, ह्या त्यांच्या हक्काबद्दल कोणाही व्यक्तीस हरकती द्यावयाच्या असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात आपली हरकत दाखल करावी.

वरील अर्जास विहित मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास अर्जदारांच्या विनंतीप्रमाणे सदर कामी वारसाचा दाखला देण्यात येईल व त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

आज दि.१०/०२/२०२१ रोजी माझ्या सहीने व कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिली.

सही/–
क.लिपीक
दि.न्या.व.स्तर, पनवेल

(कोर्टाचा शिक्का)

सही/–
सहा. अधिक्षक
दि.न्या.व.स्तर, पनवेल

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येत आहे की, मौजे : धोधाणी, ता.पनवेल, जि.रायगड येथील मालडुंगे ग्रामपंचायत हद्दीतील खालील प्रमाणे वर्णन केलेली बिनशेती जमीन मिळकत आहे.

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे : धोधाणी, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड**

| गाव | सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|
| धोधाणी | ८ | ३/४ | ९–५०–0 | 0.00 |

वर वर्णन केलेली मिळकत श्री.सुहास वसंत देशपांडे, वय : ६५ वर्षे, व्यवसाय : शेती/व्यापार, रा.फ्लॅट नं.१०, सेन्चुरी सह. गृह. संस्था मर्या., रोड नंबर ५, हिमाचल मित्र मंडळ समोर, पेस्तम सागर, मु.चेंबूर, जि.मुंबई, पिन ४०००८९ यांचे ताबेकब्जातील व वहिवाटी वरील वर्णनाची बिनशेती जमीन मिळकत आहे. सदर मिळकत ही श्री.विनायक गुरुनाथ जगे, वय : ४६ वर्षे, व्यवसाय : शेती/नोकरी, रा.निलकंठ गार्डन, फ्लॅट नं.४०३, बी विंग, प्लॉट नं.२९/५, ५२ बंगला, स्वामी नारायण मंदिर जवळ, मु.पो. व ता.पनवेल, जि.रायगड, पिन ४१०२०६ यांना कायम खरेदीखताने विक्री करण्यात येणार आहे.

सदरच्या मिळकतीचा विक्री–व्यवहार करावयाचा आहे. वरील वर्णन केलेली मिळकत अथवा तिच्या कोणत्याही एका भागावर यापूर्वी विक्री, देणगी, मक्ता, वहिवाट, ताबा, देखभाल, भाडेपट्टा, लिज, तबदील, ट्रस्ट, गहाण, कुळ, वारस इत्यादी कोणत्याही हक्क असलेल्या सर्व संबंधितांनी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ दिवसांचे आत आपल्या लेखी हरकती कागदोपत्रासहीत व पुराव्यासहीत खा–लील सही करणार यांच्याकडे ज्यांच्या खालील दिलेल्या पत्यावर पोहचवावी अथवा रजिस्टर पोस्टाने दाखल कराव्यात. वरील मुदतीत कोणाकडूनही काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास सदर वरील मिळकत निर्वध, बोजारहीत असून त्यावर कोणत्याही प्राकरचा दावा, हक्क, हितसंबंध नाही असे समजून सदर मिळकतीचा व्यवहार पूर्ण केला जाईल व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी, दावे बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहीत धरुन सदरचा व्यवहार पूर्ण केला जाईल याची तत्सम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

दि.११/०२/२०२१

**सही/–**
**श्री.विनायक गुरुनाथ जगे**
**रा.जागृत इंटरप्रायझेस, गाळा नं.0७,**
**कनक सरोवर सह.गृह संस्था,**
**मु.पो. व ता.पनवेल, जि.रायगड, पिन ४१०२०६**
**मो.नं.९८१९१९९५९९/७९७७८९९२९०**

मे.मुजावर सो.

वकील पि.जी.दानवले

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे न्यायालयात, पनवेल

दि.चौ.अर्ज क्र.१३३/२०२१

नि.नं.८/ड

ने.ता.१६/०४/२१

श्रीमती.किसनाबाई गोमा घरत
अर्जदार राहणार : घरत आळी, उलवेगाव,
तरघर, उलवे–४१०२०६

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, कै.बळीराम गोमा घरत हे उलवेगाव, तरघर येथील कायमस्वरुपी रहिवाशी होत्या. त्यांचा मृत्यू ०३/०९/२०२० रोजी सदनिका नं.६०१, श्री क्रिष्णा टॉवर, प्लॉट नं.४१, सेक्टर ३, उलवे, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड येथे झाल्याने अर्जदार यांनी कै.बळीराम गोमा घरत यांच्या नावे असलेल्या खालील मिळकतीचे वारसपत्र मिळणेकामी अर्ज केला आहे.

**परिशिष्ट 'अ' मिळकतीचे वर्णन**

**१) सदनिका नं.६०३, ६ वा मजला, एकूण बांधीव क्षेत्र ४३१.५७ चौ.फूट, श्री.क्रिष्णा टॉवर, प्लॉट नं.४१, सेक्टर ३, उलवे, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड**

**२) सदनिका नं.७०१, ७ वा मजला, एकूण बांधीव क्षेत्र ७४७.१८ चौ.फूट, श्री क्रिष्णा टॉवर, प्लॉट नं.४१, सेक्टर ३, उलवे, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड**

वरील अर्जदार श्रीमती.किसनाबाई गोमा घरत या कै.बळीराम गोमा घरत यांच्या आई आहेत. त्याप्रमाणे ते कै.बळीराम गोमा घरत ह्यांचे कायदेशीर वारस आहेत. ह्या हक्काबद्दल कोणाही व्यक्तीस हरकती घ्याव‌याच्या असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत ह्या मे.कोर्टात प्रत्यक्ष हजर राहून हरकती घ्यावयाच्या आहेत. जर या कालावधीमध्ये योग्य त्या हरकती घेतल्या नाहीत तर हे मे.कोर्ट वरील अर्जदार यांच्या हक्काबद्दल पुरावा घेण्याची ताबडतोब कार्यवाही करेल आणि ते श्रीमती.किसनाबाई गोमा घरत यांच्या वारस पत्रास हक्कदार आहेत असे सिद्ध झाल्यास त्यांना हे वारसपत्र मंजूर करेल, त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दि.१०/०२/२०२१ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

सही/–
क.लिपीक
दि.न्या.व.स्तर, पनवेल

(कोर्टाचा शिक्का)

सही/–
सहा. अधिक्षक
दि.न्या.व.स्तर, पनवेल

पृष्ठ क्र.१ वरुन...

## वाहतुकीमुळे साळावपूलाला धोका?

यापुलावरुन होणारी अवजड वाहतूक बंद करण्यात यावी. याबाबत अनेक वेळा संबंधित अधिकाऱ्यांना निवेदने, विनंत्या करूनही अद्यापही होत असलेल्या अवजड वाहतुकीमुळे आज परिस्थिती जैसे थे अशीच दिसून येते आहे.

शासनाच्या वरीष्ठ अधिकारी वर्गाने यात वेळीच लक्ष पुरवून अवजड वाहतूक बंद करण्यात न आल्यास वेळप्रसंगी या ठिकाणी देखील आंबेत पुलासारखी परिस्थिती निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. अशी भावना व्यक्त होत असून या पुलावरून अवजड वाहतूक बंद करण्यात यावी व पर्यायी पूल बांधण्यात यावा. अशी मागणी केली जात आहे.

## पेणमध्ये ६ ग्रामपंचायत सरपंच बिनविरोध

अनुसूचित जमाती खुला प्रवर्गासाठी सरपंचपदी ज्योती रुपेश वाघमारे तर उपसरपंच म्हणून भागेश्री रमेश बामगुडे बिनविरोध झाले आहेत. यासह बोर्झे मध्ये सर्वसाधारण महिला वर्गाकरीता सरपंचपदी विजया विष्णू ठाकूर आणि उपसरपंचपदी विजय मारुती ठाकूर बिनविरोध झाले आहेत. खारपाले ग्रामपंचायत मध्ये नागरीकांचा मागास प्रवर्ग खुला करीता सरपंच कविता वसंत गावंड तर सुजाता प्रकाश तांबोळी उपसरपंचपदी विराजमान होऊन कालेश्री ग्रामपंचायतीच्या सर्वसाधारण महिला प्रवर्ग करीता सरपंचपदी दिपीका मंगळदास ठाकूर तर उपसरपंच संजय शंकर पाटील बिनविरोध झाले असल्याची महिती पेण तहसील कार्यालयाकडून देण्यात आली आहे.

## १ लाख १० हजाराचा ऐवज परत

२५ हजार रुपये एक हेडफोन किमत रुपये ५०० असा १ लाख १० हजार ५०० रुपयाचा ऐवज त्यामध्ये होता.

बॅगे सापडलेल्या आधारकार्ड आणि लोको पायलट ओळखपत्रावरील फोन क्रमांकावरून सानपाडा येथे सीनियर लोको पायलट असलेले व पामरूची, पनवेल मध्ये रहाणारे भुपेश श्रीवास्तव यांच्याशी उप निरीक्षक रेणू पटेल यांनी संपर्क करून त्यांना रेल्वे सुरक्षा बलाच्याठाण्यात बोलावून घेतले. त्यांनी आपण रात्र पाळी करून पनवेल येथे आल्यावर लोकल मध्ये बॅग विसरल्याचे सांगितले. त्यांनी बॅगेची ओळख पटवल्यावर त्यांना ऐवजासह बॅग परत देण्यात आली.आपली बॅग परत मिळाल्याने त्यांनी उप निरीक्षक रेणू पटेल, हवालदार सतीशकुमार आणि महिला हवालदार भगवती यांचे आभार मानले.

## रोह्यात वाहन परवाने रखडले, नागरिक संतप्त

भेट घेणार असल्याचे समजते.

परवाण्यासाठी ज्यांनी अर्ज भरले आहेत त्यांचे परवाने सहा महिने रखडले आहेत. अश्या लोकांना परवाना नसल्याने वाहतुक पोलीस व आरटीओकडून पकडले जाते व नाहक दंडात्मक कारवाइला सामोरे जावे लागते. त्यामुळे रोह्यातील संतप्त नागरिकांनी आता कोटा वाढविण्याची मागणी केली आहे.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# संक्षिप्त...

## तळोजा व खारघर वाहतूक शाखेतर्फे रक्तदान शिबीर संपन्न

**दै.रायगड नगरी । पनवेल**

करोनाचे महामारीचा मुकाबला करीत असताना आरोग्यसेवेस रक्त तुटवडा जाणवत असल्याने सामाजिक दायित्व स्वीकारून नवी मुंबई पोलिस आयुक्तालयाच्या वतीने रस्ता सुरक्षा अभियान २०२१ अंतर्गत तळोजा व खारघर वाहतूक शाखे मार्फत टी. एम. ए. हॉल, स्टेट बँक ऑफ इंडिया शेजारी, तळोजा एमआयडीसी, तळोजा येथे रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले होते सदर ठिकाणी खारघर व तळोजा एमआयडीसीतील कंपनी चे नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देऊन १०८ बॉटल रक्त प्राप्त केले. सदर रक्तदान शिबिर हे पोलिस उपायुक्त वाहतूक शाखा पुरुषोत्तम कराड यांचे मार्गदर्शनाखाली खारघर आणि तळोजा वाहतूक शाखेचे पोलीस निरीक्षक आनंद चव्हाण व महेश पाटील व त्यांचे सहकारी यांनी उत्कृष्ट उत्कृष्टपणे नियोजन करून रक्तदान शिबीर यशस्वी केले.

# ‘शिवगान स्पर्धा २०२१’ : सातारा येथे अंतिमफेरी ; मानसी जगताप आणि सामगंध कला केंद्र करणार उत्तर रायगडचे नेतृत्व

**दै.रायगड नगरी । पनवेल**

महाराष्ट्र प्रदेश भारतीय जनता पार्टी सांस्कृतिक प्रकोष्ठच्या वतीने ’ द्विस्तरीय शिव–गान स्पर्धा २०२१’ चे आयोजन करण्यात आले आहे. त्या अंतर्गत झालेल्या उत्तर रायगड जिल्हा प्राथिमक फेरीतील स्पर्धेत पनवेलच्या मानसी जगताप यांनी वैयक्तिक गटात तर सामगंध कला केंद्र पनवेल यांनी सांघिक गटात प्रथम क्रमांक पटकाविला असून ते सातारा येथे होणाऱ्या अंतिम फेरीत उत्तर रायगड जिल्ह्याचे नेतृत्व करणार आहेत.



छत्रपती शिवाजी महाराज यांच्यावरील पोवाडा, पाळणा, शिवस्फूर्तिगीत, आरती, ओवी, ललकारी,अभंग, आदी प्रकारच्या गीतांचा समावेश असलेल्या या स्पर्धेचे आयोजन महाराष्ट्र प्रदेश भाजपा सांस्कृतिक सेल प्रदेशाध्यक्ष शैलेश गोजमगुंडे यांच्या नेतृत्वाखाली राज्यभरात करण्यात आले आहे. या स्पर्धेत उत्तर रायगड जिल्ह्याकडून चमकदार कामगिरी व्हावी, यासाठी भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शखाली उत्तर रायगड जिल्हा प्राथमिक फेरी स्पर्धा सीकेटी महाविद्यालयात आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेतील वैयक्तिक गटात ६३ स्पर्धकांनी तर सांघिक गटात ९ स्पर्धक संघानी सहभाग घेतला होता.

वैयक्तिक गीत गायन स्पर्धेत पनवेलच्या मानसी जगताप यांनी प्रथम क्रमांक (पारितोषिक रक्कम ०७ हजार रुपये) पटकाविला. द्वितीय क्रमांक कर्जत येथील नयन गवळी ( पारितोषिक रक्कम ०५ हजार रुपये), तर तृतीय क्रमांक कर्जत येथील शाल्मली कांबळे( पारितोषिक रक्कम ०३ हजार रुपये), उत्तेजनार्थ कर्जतचे भूषण लोभी व महेश मार्के, तसेच सांघिक गीत गायन स्पर्धेत सामगंध कला केंद्र पनवेलने प्रथम (पारितोषिक रक्कम ११ हजार रुपये) क्रमांक पटकाविला. द्वितीय क्रमांक शाहिरी गर्जना कलामंच कर्जत (पारितोषिक रक्कम ७ हजार ५०० रुपये), तृतीय क्रमांक सीकेटी कॉलेज पनवेल(५ हजार १०० रुपये) तर उतेजनार्थ क्रमांक श्री समर्थ सखाराम पाटील आणि सहकारी, उरण आणि दुर्गादेवी मंडळ कर्जत यांनी पटकाविले. सर्व विजेत्यांना भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, पनवेल महानगरपालिकेचे सभागृहनेते परेश ठाकूर, भाजप सांस्कृतिक प्रकोष्ठचे कोकण प्रांत संयोजक राहुल वैद्य, उत्तर रायगड जिल्हा संयोजक अभिषेक पटवर्धन, परिक्षक विवेक भागवत आणि वैभव घरत यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. १९ फेब्रुवारीला छत्रपती शिवाजी महाराज जयंती दिनी सा–तारा येथील अजिंक्यतारा गड येथे होणाऱ्या राज्यस्तरीय स्पर्धेत मानसी जगताप वैयक्तिक गटातून तर सामगंध कला केंद्र पनवेल सांघिक गटातून उत्तर रायगड जिल्ह्याचे नेतृत्व करणार आहेत.

# घारापुरी येथे महिलांना स्वयंरोजगार सुरू करण्यासाठी ग्रामपंचायतीचे वतीने प्रशिक्षण शिबिर संपन्न

**दै.रायगड नगरी । उरण**

महिला बचतगटातील महिलांना संक्षम करण्याच्या हेतूने ग्रामपंचायत घारापुरीचे वतीने स्तुत्य स्वयंरोजगार प्रशिक्षण शिबीर उपक्रम राबविला. सरपंच बळीराम ठाकुर यांनी श्रीफळ वाढवून शिबिराचे उद्घाटन केले.



घारापुरी हे जागतिक किर्तीचे वारसा लाभलेले पर्यटनस्थळ असल्याने येथील ग्रामस्थ लहान मोठी कटलरी दुकाने तसेच स्टॉल लाऊन पर्यटकांवर अवलंबून व्यवसाय करतात आणि याच व्यवसायाअंतर्गत ग्रामस्थांची उपजीविका चालते. मात्र कोरोना लॉकडाऊनच्या काळात पर्यटक बंदीमुळे येथील ग्रामस्थांना व्यवसाय बंद राहील्याने त्यांचेवर उपासमारीची वेळ आली होती. गेली आठ महिने बंद असलेला व्यवसाय नोव्हेंबर महिन्यापासून पर्यटकबंदी उठविल्याने सुरू झाला आहे. मात्र अजूनही पाहीजे तसे पर्यटक बेटावर येत नसल्याने येथील व्यवसाय रुळावर आला नाही.

त्यामुळे येथील ग्रामस्थांना स्वयंरोजगार उपलब्ध करून दिल्यास महिलाबचत गटातील महिला संक्षम होतील, हा उद्देश समोर ठेवून ग्रामपंचायतीने हा उपक्रम सुरू केला आहे. त्यामुळे येथील महिलांना आकर्षक वस्तू बनवून पर्यटकांना विकता येतील. तसेच अन्य ठिकाणी सुध्दा ह्या वस्तू विकता येतील. तीन दिवसाकरीता सुरु करण्यात आलेल्या शिबिरामध्ये अगरबत्ती बनविणे, पर्स बनविणे, कापडी बॅग बनविणे, पर्स मेकींग, ईमिटेशन ज्वेलरी बनविणे, आदी वस्तू बनविण्याचे प्रशिक्षण देण्यात येणार आहे. सदरचे शिबिरात महिलागटातील महिला मोठ्या संख्येने सहभागी झाल्या होत्या. शिबिराच पहिल्या दिवसी अगरबत्तीचे प्रशिक्षण देण्यात आले आणि महिलांकडुन अगरबत्ती बनवुन पॅकिंग करण्यात आले. त्यामुळे सदरच्या प्रशिक्षणामुळे स्वयंरोजगार सुरु करण्यास चालना मिळेल याची खात्री महिलांचे चेह–यावर दिसत होती. तसेच आपल्या हाताने बनविलेल्या अगरबत्ती देवाच्या चरणी ओवाळणार याचा आनंद महिलांनी व्यक्त करून दाखविला.

# पोलिस पाटलांना कोविड योद्धा पुरस्कार ; तालुका पोलिस ठाण्याचा उपक्रम

**दै.रायगड नगरी । पनवेल**

करोनाच्या काळात गावपातळीवर उत्तम कामगिरी बजावत प्रशासनाला सहकार्य करणार्या पोलीस पाटलांना पनवेल तालुका पोलीस ठाण्याच्या माध्यमातुन गौरविण्यात आले. वरिष्ठ पोलिस निरीक्षक रविंद्र दौंडकर यांच्या मार्गदर्शनाखाली पनवेलमध्ये हा अनोखा उपक्रम राबविण्यात आला.

कोरोना काळात विलगीकरण कक्ष स्थापन करण्यापासुन तेथील देखरेख यासह डॉ बाबासाहेब आंबेडकर जयंती, अण्णा भाऊ साठे जयंती, श्री कृष्णा जन्माष्टमी, ईद, रामनवमी, रमजान ईद, गणेशोत्सव, मोहरम, नवरात्र आदी सणात सामाजिक सलोखा राखुन मेहनत घेतल्याने पोलीस पाटलांना सन्मानित करण्यात आले. पोलीस उपायुक्त शिवराज पाटील यांच्याहस्ते या पो–लीस पाटलांना सन्मानित करण्यात आले. वाकडी गावातील स्वप्ननगरी रिसॉर्ट येथे कार्यक्रमाचे आयोजन केले होते. कोविड योध्दा पुरस्कार सोबतच परिमंडळ २ चे पोलिस उपायुक्त शिवराज पाटील यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले.

या कार्यक्रमात ५५ पोलिस पाटील यांना पुरस्कार देवून गौरविण्यात आले. पोलिस आयुक्तांच्या सुचनेनुसार पोलिस पाटील यांना प्रशिक्षण आणि मार्गदर्शन करण्याच्या सुचना देण्यात आल्या आहे. पोलीस पाटलांना प्रशिक्षण देण्याचे आदेश पोलीस आयुक्तांनी दिले होते. त्यानुसार हे प्रशिक्षण पार पडले यावेळी उपायुक्त शिवराज पाटील यांच्या सूचनेने या पोलीस पाटलांना कोविड यौद्धा पुरस्कार प्रदान करण्याचा उपक्रम देखील राबविण्यात आला असल्याची माहिती वरिष्ठ पोलिस निरीक्षक दौडकर यांनी दिली.

# उरण येथे रस्ता सुरक्षा अभियान ; वन डे विथ पोलीस

**दै.रायगड नगरी । उरण**

रस्ता सुरक्षा अभियान अंतर्गत वन डे विथ पोलीस हि मोहीम उरण –चारफाटा येथे उरण तालुका वाहतूक पोलीस शाखेच्या वतीने हा उपक्रम उरण तालुका वाहतूक पोलीस चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक माणिक नलावडे यांच्या मार्गदर्शनाखाली सदर उपक्रम राबविला जात आहे जनतेकडून जनतेत सुरक्षिते विषयी जागृती केली जात आहे.

या मोहिमेत जे बाईक स्वार, चारचाकी वाहन चालक नियमांचे व्यवस्तीत पालन करीत असतांना दिलले त्यांना एक गुलाब पुष्प व पत्र देऊन अभिनंदन केले जाते. जे नियमाचे पालन करीत नाहीत त्यांना दंड हि आकारण्यात आला आहे.

# संजीवनी आरोग्य संस्थेतर्फे मुरुड येथे रक्तदान शिबिराचे आयोजन

**दै.रायगड नगरी । कोर्लई**

जगविख्यात नेत्ररोग तज्ज्ञ, तथा संचालक वैद्यकीय शिक्षण व संशोधक संचनालय महाराष्ट्र राज्य तथा संस्थापक अध्यक्ष संजीवनी आरोग्य सेवा संस्था पदमश्री डॉ. तात्यासाहेब लहाने यांच्या वाढदिवसानिमित्त रक्तदान शिबीर आणि बाह्यरुग्ण तपासणी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमाचे उदघाटन कोकण युनिक फॉउंडेशन मुंबई चे अध्यक्ष सै. जमिर अ. समद. कादिरी आणि उद्योगपती आणि समाजसेवक दिल–ावर महाडकर यांचे हस्ते होणार आहे. स्नेहामाई किशोर पाटील यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न होणाऱ्या या कार्यक्रमास किफायतुला उकये, जमिर करदमे, गमन गावीत, डॉ. मकबूल कोकाटे, डॉ. विक्रमजीत पडोळे, परशुराम काबळे, अमित पंडित, गटविकासधिकारी अनिकेत पाटील, डॉ. निसार बिरवाडकर, डॉ. अमान रिफाई आदी मान्यवर उपस्थित रहाणार आहेत. संस्थेचे कार्याध्यक्ष विजय सुर्वे यांनी या शिबिराचा जास्तीतजास्त रक्तदात्यांनी लाभ घेण्याचे आवाहन केले आहे.सकाळी साडेनऊ ते दुपारी दोन वाजेपर्यंत मुरुड जंजिरा नगरपरिषदेत कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

---

अ‍ॅड.सुनील एन. मोरे

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज क्र.१०४/२०२१
नि.नं.८
ने.ता.१६/०३/२१

१) श्री.पांडुरंग गणपत थोडजी
वय : ७२ वर्षे, धंदा : काहीनाही
२) श्री.नितीन पांडुरंग थोडजी
वय : ३४ वर्षे, धंदा : नोकरी
अर्जदार नं.१ व २
रा.फ्लॅट नंबर–४०१, अे–विंग,
मधुरम कॉम्प्लेक्स, प्लॉट नं.७६/७७,
सेक्टर १९, कामोठे, ता.पनवेल, जि.रायगड
३) सौ.मनिषा सुरजसिंग छत्रे
लग्नाअगोदरचे नाव : कुमारी मनिषा पांडुरंग थोडजी
वय : ३२ वर्षे, धंदा : नोकरी
रा.फ्लॅट नंबर–१०१, शिखर अपार्टमेंट,
प्लॉट नं.०८, सेक्टर २०, कामोठे,
ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार
विरुद्ध
कुमारी आशा पांडुरंग थोडजी
वय : ३६ वर्षे, धंदा : नोकरी
रा.फ्लॅट नंबर ४०२, अे–विंग,
मधुरम कॉम्प्लेक्स, प्लॉट नं.७६/७७,
सेक्टर १९, कामोठे, ता.पनवेल, जि.रायगड — सामनेवाले

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार नं.१ यांची पत्नी व अर्जदार नं.२ व ३, तसेच सामनेवाले यांची आई कै.विमल पांडुरंग थोडजी यांच्या नावाने मिळकत सिडकोकडे नोंदीत आहे. अर्जदार नं.१ यांची पत्नी व अर्जदार नं.२ व ३, तसेच सामनेवाले यांची आई कै.विमल पांडुरंग थोडजी या तारीख २०/०५/२०११ रोजी एम.जी.एम. हॉस्पिटल, कामोठे, ता.पनवेल, जि.रायगड येथे मयत झालेले आहेत. कै.विमल पांडुरंग थोडजी यांच्या नावाने सिडको कार्यक्षेत्रात खालील वर्णनाची मिळकत सिडकोकडे नोंदीत आहे. सदर मिळकती संदर्भात वारस दाखला मिळण्यासाठी अर्जदार यांनी मे.कोर्टास अर्ज केला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे : कामोठे, ता.पनवेल, जि.रायगड १२.५% येथील सिडको हद्दीतील, फ्लॅट नं.४०१, अे–विंग, चौथा मजला, ‘‘मधुरम कॉम्प्लेक्स’’, प्लॉट नं.७६, ७७ सेक्टर नं.१९, कामोठे, ता.पनवेल, जि.रायगड**

वरील मिळकती संदर्भात अर्जदार यांच्या नावाने वारस दाखला देण्याबाबत कुणाचीही हरकत असल्यास सदरची ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत न्यायालयात सादर करावी. मुदतीत हरकत न आल्यास वारस दाखला अर्जदारांच्या नावे प्रदान करण्यात येईल.

आज दि.१०/०२/२०२१ रोजी कोर्टाच्या सही शिक्क्याने दिली.

सही/– क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल — (कोर्टाचा शिक्का) — सही/– सहा. अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल

---

अ‍ॅड.निलीमा गाडे
अ‍ॅड.मीना ठाकूर

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मो.दिवाणी न्यायाधिश क.स्तर यांचे न्यायालयात पनवेल येथे
दि.किरकोळ अर्ज क्र.८७७/२०२०
नि.नं.८/ड
ने.ता.१५/०३/२१

१) श्री.वैभव मधुकर गोरे
वय : ४० वर्षे, व्यवसाय : नोकरी
गितांजली को.ऑ.हौ.सो.लि.,
अपार्टमेंट नं.बी–४/ए/०:४,
सेक्टर १०, कळंबोली, नवी मुंबई ४१०२०१८
२) श्रीमती.रोहिणी मधुकर गोरे
वय : ६२ वर्षे, व्यवसाय : नोकरी
३) श्री.राकेश मधुकर गोरे
वय : ४२ वर्षे, व्यवसाय : नोकरी
४) श्री.तुषार मधुकर गोरे
वय : ३९ वर्षे, व्यवसाय : नोकरी
सर्वजण राहणार : रुम नं.ए ३०/८ सेक्टर २१,
तुर्भे, वाशी, नवी मुंबई ४०००७० — अर्जदार

१) वरील पैकी अर्जदार यांनी मा.न्यायालयात वारस दाखला मिळविण्यासाठी अर्ज दाखल केला आहे. अर्जदार क्र.१ ते ४ हे मयत मधुकर जगन्नाथ गोरे यांचे वारसदार असून अर्जदार क्र.१ हा मयत मधुकर गोरे यांचा दुसरा मुलगा आहे. अर्जदार क्र.२ मयत मधुकर गोरे यांची पत्नी आहे. अर्जदार क्र.३ हा मयत मधुकर गोरे यांचा पहिला मुलगा आहे व अर्जदार क्र.४ हा मयत मधुकर गोरे यांचा तीसरा मुलगा आहे. मयत मधुकर जगन्नाथ गोरे हे दि.०६/०६/२०१३ रोजी वाशी येथील हिरानंदानी हॉस्पिटल येथे अल्पशा आजाराने मृत्यू पावलेत.

२) मयत मधुकर जगन्नाथ गोरे यांच्या नावे असलेल्या घराचे/ स्थावर मालमत्तेचे परिशिष्ट :

**गीतांजली को.हौ.सो.लि., अपार्टमेंट नं.बी–४/ए/०:४, सेक्टर १०, ता.पनवेल, जिल्हा : रायगड, कळंबोली, नवी मुंबई ४१०२१८**

३) याप्रमाणे मयत मधुकर जगन्नाथ गोरे यांचे अर्जदार क्र.१ ते ४ हे खरे वारसदार असून यांच्या व्यतिरिक्त इतर कुणीही कायदेशीर वारसदार नाहीत. अर्जदार हे मयताचे वारस नाहीत असे कोणास समजविण्याचे असेल आणि वरील मिळकतीच्या वारस दाखल्याबाबत कोणाचे हक्क व अधिकार अथवा हितसंबंध अशी कोणत्याही प्रकारची तक्रार वगैरे असल्यास त्याने तशी लेखी हरकत जाहीरनामा प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांचे आत या न्यायालयात हजर होवून दाखल करावी.

वरील मुदतीत कोणी योग्य हरकती न घेतल्यास सदरहू न्यायालय वरील अर्जदार ह्यांच्या हक्काबाबत पुरावा घेवून त्याचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदर मयताचे वारस दाखला देण्यात येईल व त्यानंतर आलेल्या हरकतीचा विचार केला जाणार नाही.

आज दि.३०/१/२०२१ रोजी माझे सहीने आणि न्यायालयाच्या शिक्क्याने दिले.

सही/– क.लिपीक दि.न्या.क.स्तर, पनवेल — (कोर्टाचा शिक्का) — सही/– सहा. अधिक्षक दि.न्या.क.स्तर, पनवेल

---

मा.पाठक सो.
अर्जदाराचे वकील
अ‍ॅड.प्रगती माळी

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश व.स्तर यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज क्र.८७/२०२१
नि.नं.७/ड
ने.ता.१८/०३/२१

कै.केशव बाबु ठाकूर (मयत यांचे कायदेशीर वारसदार)
१) श्रीमती.आशा केशव ठाकूर
वय : ६० वर्षे, धंदा : शेती
२) सौ.कल्याणी मनोहर म्हात्रे
उर्फ कल्याणी केशव ठाकूर
वय : ३८ वर्षे, धंदा : शेती
३) श्री.कल्पेश केशव ठाकूर
वय : ३५ वर्षे, धंदा : गृहिणी
४) श्री.मंगेश केशव ठाकूर
वय : ३३ वर्षे, धंदा : शेती
१ ते ४ सर्व मु.कोपर, पोस्ट : गव्हाण,
ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही

१) कै.केशव बाबु ठाकूर हे दि.२३/०९/२०२० रोजी डॉ.डी. वाय.पाटील हॉस्पिटल, नेरुळ, नवी मुंबई येथे मृत्यू पावले. तसेच त्यांचे वडील कै.बाबु काथारी ठाकूर हे दि.०१/०४/१९८८ रोजी मौजे : कोपर, पो.गव्हाण, ता.पनवेल, जि.रायगड येथे मृत्यू पावले. तसेच त्यांची पत्नी कै.बाबलुबाई बाबू ठाकूर या देखील दि.१३/०१/२००२ रोजी मौजे : कोपर, पो.गव्हाण, ता.पनवेल, जि.रायगड येथे मृत्यू पावले.

२) कै.केशव बाबू ठाकूर हे मयत झाल्यानंतर त्यांना अर्जदार क्र.१ सौ.श्रीमती.आशा केशव ठाकूर ही पत्नी अर्जदार क्र.२ कल्याणी मनोहर म्हात्रे ही विवाहित मुलगी व अर्जदार क्र.३ व ४ कल्पेश आणि मंगेश हे मुलगे कायदेशीर वारसदार आहेत.

३) मयत कै.केशव बाबू ठाकूर यांच्या मालकीच्या व ताबे कब्जातील जमीन मिळकतींचे वर्णन पुढीलप्रमाणे आहेत.

**मिळकतींचे वर्णन**

**मौजे : गव्हाण, ता.पनवेल, जि.रायगड**

| विभाग | युनिट केस नं. | स.नं./ हि.नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. |
|---|---|---|---|
| गव्हाण | ४७५ | ४८/३ | ०–२८–० |
| | | ७७/४ | ०–२९–० |

सदर मिळकतीचे सहहिस्सेदार म्हणून सामाईक हक्क असणाऱ्या कै.केशव बाबू ठाकूर यांचे निधनानंतर त्यांचे कायदेशीर वारसदार म्हणून वारस दाखला मिळणेकामी अर्जदार यांनी मे.कोर्टात अर्ज केला आहे. याबाबत कोणाचीही कसल्याही स्वरुपाची हरकत असल्यास सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एक महिन्याचे आत मे.कोर्टासमोर हजर राहून हरकत कळवावी. विहित मुदतीत हरकत न आल्यास वरील अर्जदार हेच कायदेशीर वारस असल्याबाबत वारस दाखला प्रदान केला जाईल. मुदतीनंतर येणाऱ्या हरकती ग्राह्य धरल्या जाणार नाहीत.

आज दि.४/२/२०२१ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

सही/– क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल — (कोर्टाचा शिक्का) — सही/– सहा. अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल

---

मा.पाठक सो.
अर्जदाराचे वकील : नरेश म्हस्कर
अनिल पाटील

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश (व.स्तर) यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज क्र.१८१/२०२१
नि.नं.७/ड
ने.ता.०७/०४/२१

१) श्री.बळीराम चाहू गोंधळी
२) श्री.धनाजी चाहू गोंधळी
रा.कामोठे, ता.पनवेल, जि.रायगड
३) श्रीमती.माईबाई चाहू गोंधळी
रा.कामोठे, ता.पनवेल, जि.रायगड
४) सौ.संगीता पुरुषोत्तम पाटील
रा.कोळखे, पो.ओ.एन.जी.सी.,
ता.पनवेल, जि.रायगड
५) श्री.दिलीप बाळाराम म्हात्रे
६) श्री.समीर बाळाराम म्हात्रे
रा.वाजे, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही — सामनेवाला

तमाम जनतेस या जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, अर्जदार नं.१, २ व ४ यांचे वडील व अर्जदार नंबर ३ यांचे पती व अर्जदार नं.५ ते ६ यांचे आजोबा कै.चाहू हाल्या गोंधळी हे दि.२७/०३/२०१९ रोजी मौजे : कामोठे, ता.पनवेल, जि.रायगड येथे मयत झाले आहेत. तसेच अर्जदार नंबर ५ व ६ यांची आई कै.राधाबाई बाळाराम म्हात्रे ही दि.२४/०९/२०१९ रोजी एम.जी.एम.हॉस्पिटल कामोठे, ता.पनवेल, जि.रायगड येथे मयत झाली आहे. कै.चाहू हाल्या गोंधळी यांच्या मालकीच्या मौजे : कामोठे, ता.पनवेल, जि.रायगड येथील खालील वर्णनाच्या मिळकती आहेत. अ) मौजे : कामोठे, ता.पनवेल, जि.रायगड येथील खालील वर्णनाची शेतजमिनीची मिळकती सिडकोतर्फे संपादीत झालेली आहे. त्यांचे वर्णन

**संपादीत शेतजमिनीचे वर्णन**

| गावाचे नाव | सर्व्हे नंबर | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. | युनिट केस नं. |
|---|---|---|---|---|---|
| कामोठे | ७९ | ३ A | ०–४२–४ | ५.८७ | कामोठे २० |
| कामोठे | ६८ | २४ | ०–४९–० | ०.९१ | कामोठे २० |
| कामोठे | ८६ | १ | ०–३५–४ | ६.७६ | कामोठे २० |
| कामोठे | ८६ | ६ | ०–९–१ | ०.९१ | कामोठे २० |
| कामोठे | ४५ | ५ | ०–३५–९ | १.१३ | कामोठे २० |

ब) कै.चाहू हाल्या गोंधळी यांच्या मालकीच्या मौजे : कामोठे, ता.पनवेल, जि.रायगड येथील पनवेल शहर महानगरपालिका हद्दीतील मिळकतीचे वर्णन

१) मौजे : कामोठे, ता.पनवेल, जि.रायगड येथील घर मिळकत क्रमांक / मालमत्ता क्रमांक–४६४, आर.सी.सी.स्वरुपाचे घर, तळ मजला, क्षेत्रफळ ८१२ चौ.फू./चौ.मी. क्षेत्राची घर मिळकत

२) घर मिळकत क्रमांक/मालमत्ता क्रमांक ११०, दगड सिमेंट विटांचे कौलारु घर, क्षेत्रफळ ८१५.७६ चौ.फू/चौ.मी. अशा स्वरुपाची मिळकत आहे.

क) मौजे : कामोठे, ता.पनवेल, जि.रायगड येथील सिडको हद्दीतील खालील वर्णनाच्या सदनिका/फ्लॅट आहेत.

१) सदनिका क्र.३०२, ए विंग, तिसरा मजला, गुरुदेव सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित प्लॉट नं.२७, सेक्टर २०, क्षेत्र ७१२.८९ चौ.फूट कारपेट एरिया (७९.४८ चौ.फूट बिल्टअप एरिया) (सुपर बिल्टअप एरिया १०६५ चौ.फूट एरिया) कामोठे, ता.पनवेल, जि.रायगड नवी मुंबई

२) सदनिका क्र.१३०३ ए विंग, तेरावा मजला, गुरुदेव सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित, प्लॉट नं.२७, सेक्टर २०, क्षेत्र ७१२.८९ चौ.फूट कारपेट एरिया (७९.४८ चौ.फूट बिल्टअप एरिया) (सुपर बिल्टअप एरिया १०६५ चौ.फूट एरिया) कामोठे, ता.पनवेल, जि.रायगड नवी मुंबई अशा स्वरुपाची मिळकत आहे.

तरी वरील मिळकतीबाबत कौ.चाहू हाल्या गोंधळी यांचे कायदेशीर वारस असल्याचा वारस दाखला मिळण्यासाठी अर्जदार यांनी नामदार कोर्टात अर्ज दाखल केला आहे. तरी सदर वारस दाखल्याच्या कामी कोणाच्याही कसल्याही हरकती असल्यास सदरच्या हरकती ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एक महिन्याचे आत मेहरबान कोर्टात दाखल कराव्यात. मुदतीनंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही. व अर्जदार यांचे लाभांत वारस दाखला दिला जाईल याची नोंद घ्यावी.

आज तारीख ९/२/२०२१ रोजी माझ्या सहीने व कोर्टाचे शिक्क्याने नोटीस दिली.

सही/– क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल — (कोर्टाचा शिक्का) — सही/– सहा. अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल

# संक्षिप्त...

## खांब ग्रा.पं.सरपंचपदी रंजना टवळे यांची तर उपसरपंचपदी मनोज शिर्के

**दै.रायगड नगरी । खांब-रोहा**

नुकत्याच झालेल्या ग्रा.पं.निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेसचे वर्चस्व असलेल्या व पुर्णपणे बहुमताने सत्ता प्रस्थापित केलेल्या ग्रु.ग्रा.पंचायत खांब ग्रा.पंचायतीच्या आज झालेल्या सरपंच व उपसरपंच पदाचे निवडणुकीत सरपंचपदी रंजना योगेश टवळे यांची तर उपसरपंचपदी मनोज अनंत शिर्के यांची निवड करण्यात आली आहे.

कोकणचे भाग्यविधाते तथा रायगडचे खा.सुनील तटकरे, पालकमंत्री आदिती तटकरे व आ.अनिकेत तटकरे यांच्या माध्यमातून या ग्रा.पंचायतीचे विकासकामांसाठी नेहमीच झुकते माप मिळाल्याने व मोठ्या प्रमाणावर विकासकामे मार्गी लागल्याने राष्ट्रवादी काँग्रेस पक्षच आपल्या ग्रा.पंचायतीचा विकास करू शकतो हा सुज्ञ मतदारांचा ठाम विश्वास असल्याने मतदारांनीही राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला पुनश्च सत्तेची संधी दिल्याने राष्ट्रवादी काँग्रेसने या ग्रा.पंचायतीवर आपले निर्विवादपणे वर्चस्व प्रस्थापित केले.

सरपंचपदासाठी सर्वसाधारण महिला आरक्षण असल्याने सरपंच पदासाठी इच्छूक सदस्यांची संख्याही मोठी असल्याने पहिल्या सरपंच पदाचा बहुमान कोणाला मिळतोय याकडे सा-यांचेच लक्ष लागले असतानाच पक्षश्रेष्ठींनी योग्य निर्णय घेऊन पहिला सरपंचपदाचा मान रंजना टवळे यांना दिल्याने शेवटी त्यांची सरपंचपदासाठी नियुक्ती करण्यात आली आहे.

या निर्णय प्रक्रियेत निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून यलमार यांनी काम पाहिले.

# आडावळे खुर्दतील चारऐवजी दोनच सीटचे संडास बांधून झालेल्या शौचालय घोटाळ्याचा बातमीचा तातडीने इफेक्ट!

**दै.रायगड नगरी । पोलादपूर**

तालुक्यातील आडावळे बुद्रुक ग्राम पंचायतीअंतर्गत आडावळे खुर्द येथे 'स्वच्छ भारत मिशन' अंतर्गत ४ सीटचे शौचालय बांधकामाऐवजी केवळ २ सीटचे शौचालय बांधून कामाच्या बिलापोटीची सर्व रक्कम दोष निवारण कालावधी संपुष्टात येण्यापूर्वीच काढण्यात यश आल्याचे तक्रारदाराचे म्हणणे असून पोलादपूर पंचायत समितीने याप्रकरणी गंभीर स्वरूपात दखल घेऊन गुन्हा दाखल करण्याची मागणी या तक्रारअर्जात करण्यात आल्याची 'ती' बातमी प्रसिध्द होताच पोलादपूर पंचायत समिती प्रशासनाने संबंधित ठेकेदार आणि ग्रामपंचायतीची चांगलीच कानउघाडणी केली आणि संभाव्य कायदेशीर कारवाईच्या भितीने संडासच्या उर्वरित दोन सीटसाठी नव्याने बांधकाम सुरू झाले आहे.



पोलादपूर तालुक्यात राजकीय समीकरणांचा सामाजिक मेळ घालण्याच्या प्रयत्नात गावो-गावी विविध शासकीय योजनांमध्ये संगनमताने भ्रष्टाचार केला जात असून स्थानिक स्वराज्य संस्थेमध्ये लोकप्रतिनिधी म्हणून सत्तेत आलेल्यांच्या या गैरकारभाराविरूध्द स्थानिक ग्रामस्थ नेहमीच मूग गिळून गप्प बसत असल्याचे दिसून आले आहे. केंद्रसरकारच्या 'स्वच्छ भारत मिशन' अंतर्गत रायगड जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी प्रशासकीय मान्यता देणाऱ्या पत्रामध्ये कामाच्या ठिकाणी १५० सेमी उंच आणि ९० सेमी रूंदीचा नामफलक कामाच्याठिकाणी लावून त्यावर योजनेचे नांव 'स्वच्छ भारत मिशन', कामाची अंदाजपत्रकीय किंमत २ लाख रूपये, काम सुरू केल्याचा दिनांक व काम पूर्ण होण्याचा कालावधी, कंत्राटदाराचे नांव व ठिकाण नमूद करून गटविकास अधिकारी यांनी सदरची कामे पंचायत समिती स्तरावर पूर्ण करून घ्यायची असल्याचे प्रशासकीय मंजूरीच्या पत्रामध्ये स्पष्ट निर्देश दिले आहेत. मात्र, आडावळे बुद्रुक ग्रामपंचायतीअंतर्गत आडावळे खुर्द येथे 'स्वच्छ भारत मिशन' अंतर्गत ४ सीटचे शौचालय बांधकामाऐवजी केवळ २ सीटचे शौचालय बांधताना त्यावर ४ सीटचे शौचालय असल्याच्या उल्लेखासह सर्व मुद्दे लिहून बिलापोटी रक्कम काढण्याच्या गैरव्यवहाराकडे तत्कालीन गटविकास अधिकारी यांचे दूर्लक्ष झाल्याची तक्रार विद्यमान गटविकास अधिकारी धनंजय जगताप यांच्याकडे लेखी स्वरूपात तक्रारदार हेमंत युवराज भोईटे यांनी केली. या पार्श्वभुमीवर ही बातमी प्रसिध्द झाल्यानंतर पोलादपूर तालुक्यात बातमीची जोरदार चर्चा होऊन खळबळ उडाली होती.

यानंतर पोलादपूर पंचायत समितीच्या बांधकाम विभागाने तसेच गटविकास अधिकारी धनंजय जगताप यांनी याप्रकरणी दखल घेऊन ग्रामपंचायत आडावळे बुद्रुक यांना संबंधित ठेकेदाराकडून चार सीटचे शौचालय बांधून पूर्ण न केल्यास कारवाईचे संकेत दिल्याने या कामाने तातडीने वेग घेतला आहे.

# गोवे सरपंच पदी महेंद्र पोटफोडे तर उपसरपंच पदी नितीन जाधव विराजमान

**दै.रायगड नगरी । खांब-रोहा**

खांब विभागातील कायम प्रतिष्ठित समजली जाणारी ग्रुप ग्रा. पंचायत गोवे सरपंच पदी खासदार सुनील तटकरे यांच्या कृपा आशीर्वादाने पालकमंत्री आदिती तटकरे आ.अनिकेत तटकरे यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे गोरगरीब जनतेचे कैवारी श्री महेंद्र नामदेव पोटफोडे हे सरपंच पदी तर उपसरपंच पदी नितीन तानाजी जाधव हे विराजमान झाले असून बुधवार दि.१० फ्रे.रोजी त्यानी आपला पदभार स्वीकारला आहे.

यावेळी अधिकारी श्री गुंजाळ, हिंदोले तात्या, तसेच मा.स.रामशेठ कापसे, नरेंद्र जाधव, प्रवीण पवार, संदीप जाधव, मा.सदेश कापसे, तानाजी मोरे, लहू पिपळकर, नवनिर्वाचित ग्रामपंचायत सदस्य, नरेंद्र पवार, सुप्रिया जाधव, अंजली पिपळकर, रंजिता जाधव, भावना जवके, भरत कापसे, सुमित गायकवाड तसेच ग्रामसेवक गोविंद शिद, अनंता पवार, रामचंद्र पवार, बाबू पवार, बळीराम जाधव, सुरेश जाधव, किरण पवार, सुभाष पवार, अनिल पवार, राजेंद्र जाधव, नितीन जवके, भरत जाधव, नंदा वाफिलकर, गोविंद गायकवाड, रमेश गायकवाड, मधुकर कापसे, पोलीस कर्मचारी याकुब तडवी, प्रसात पाटील, सौ चेरकर मॅडम, पोलीस पाटील सुरेश जाधव, कोलाड विभाग मधील पत्रकार कल्पेश पवार, व शिरवली, गोवे, मुठवली ग्रामस्थ यांनी सरपंच, उपसरपंच यांना शुभेच्छा दिल्या आहेत. यावेळी येथे कोणतेही अनुसूचित प्रकार घडू नये म्हणून कोलाड सपोनि सुभाष जाधव यांनी गोवे भेट देऊन पाहणी केली.

# पालिका क्षेत्रातील नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र आजारी ; १०५ पदे रिक्त

**दै.रायगड नगरी । पनवेल**

कोविड मध्ये उद्ववलेल्या आरोग्याच्या परिस्थितीमुळे यावर्षी अर्थसंकल्पात सरकारने आरोग्यावर फोकस केला आहे. पनवेल महानगरपालिका क्षेत्रात देखील सहा नागरी प्राथमिक केंद्रांचा समावेश आहे. पालिकेच्या स्थापनेला ४ वर्षाचा कार्यकाळ लोटला तरी देखील अद्याप याठिकाणच्या नागरी प्राथमिक आरोग्य केंद्राचा गाढा अपुर्या कर्मचार्यांवर लागत आहे.

पालिका क्षेत्रात कोविड रुग्णांचा ३० हजारांचा पल्ला गाठला आहे. कोविड काळात या आरोग्य केंद्रांचा वापर अँटीजेन चाचण्या तसे च लहान आजारांवर औषधोपचारासाठी मोठ्या प्रमाणात करण्यात आला. इतर वेळा देखील सर्वसामान्य मोठ्या प्रमाणात आरोग्य केंद्राचा वापर करीत असतात. मात्र सध्याच्या घडीला हे नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रच आजारीच असल्याचे दिसून हयेत आहेत. पालिकेच्या सहा नागरी प्राथमिक आरोग्य केंद्राचा तब्बल १०५ पदे रिक्त असून केवळ ८० कर्मचार्यांच्या आधारावर या आरोग्य केंद्राचे काम सुरु आहे.

एकीकडे पालिकेच्या लोकसंख्येत दिवसेंदिवस भर पडत चालली आहे. तर दुसरीकडे आरोग्य यंत्रणा अपुरी पडत आहे. अपुऱ्या कर्मचाऱ्यांमुळे इतर कर्मचाऱ्यांमुळे कामाचा बोजा पडत आहे. लवकरात लवकर रिक्त पदे भरण्याची गरज आहे, यापूर्वी यापैकी काही आरोग्य केंद्र सिडकोच्या ताब्यात होती. वर्षभरापूर्वीच या आरोग्य केंद्राचे हस्तांतरण पालिकेकडे झाले आहे.

जिल्ह्यातील नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र -६, एकूण कर्मचारी -१८५, रिक्त -१०५ पदे आहेत.

> ७ डॉक्टरांची आवश्यकता असताना सध्याच्या घडीला केवळ ३ डॉक्टर पालिकेत कार्यरत आहेत. ६ नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रांची जबाबदारी या ३ डॉक्टरांवर आहे. अद्यापही ४ डॉक्टरांची आवश्यकता असताना पदे मंजुर असताना देखील ४ डॉक्टरांची पदे अद्यापही रिक्तच आहेत.विशेष म्हणजे १०५ रिक्त पदांमध्ये राष्ट्रीय आरोग्य कार्यक्रम राबविण्यात आरोग्य विभागाला अडचण निर्माण होत असून इतर कर्मचा-यावर हा भर पडत आहे.

> उपसंचालक आरोग्य सेवा मुंबई, ठाणे मंडळ यांच्या माध्यमातुन रिक्त जागा भरण्यास मंजुरी मिळाली आहे. लवकरच सर्व प्रक्रिया पार पडल्यानंतर नव्याने या रिक्त जागा भरल्या जातील.
>
> **- डॉ आनंद गोसावी (मुख्य वैद्यकीय अधिकारी, पनवेल महानगरपालिका )**


## पनवेल महानगरपालिका

**महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे प्रकरण ११ व कराधाननियम ८, अन्वये ५ (पाच) वर्षाकरिता सुधारित कर आकारणीची प्राथमिक यादी जाहीर प्रसिद्धी बाबत सूचना नोटीस**

## जाहीर सूचना

पनवेल महानगरपालिका प्रभाग समिती कार्यालय 'अ' अंतर्गत खारघर सिडको नोड क्षेत्रातील सर्व मालमत्ता धारकांना या जाहीर नोटीस द्वारे कळविण्यात येते की,

आपल्या भोगवट्यातील इमारतीची व भूखंडाचे तपासणी व करमुल्यांकन करून महानगरपालिका अधिनियमचे प्रकरण ८ मधील करारधान नियम ९ अन्वये पनवेल महानगरपालिकेने दि.१ ऑक्टोबर २०१६ पासून ते सन २०२०-२१ या पाच वर्षाकरिता इमारतीचे व भूखंडाचे कर निर्धारणकरिता करमुल्यांकन याद्यांची प्रसिद्धी दि.१२/०२/२०२१ रोजी करण्यात येत आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे प्रकरण ८ कराधान नियम क्र.१५ अन्वये प्रारुप करमुल्यांकन यादी व मालमत्ता निहाय करमुल्यांकन प्रकरणे जाहीर प्रसिद्ध केली आहे. तसेच प्रत्येक करदात्यास विशेष नोटीस वैयक्तीक स्तरावर बजाविण्यात आले आहेत व जाहीर प्रसिद्ध केलेली प्रारुप करमुल्यांकन यादी प्रभाग समिती 'अ', सेक्टर क्र.-१३, प्राथमिक शाळे जवळ, पूर्वाश्रमीचे ग्रामपंचायत कार्यालय खारघर, पनवेल महानगरपालिका या कार्यालयात पाहणीसाठी उपलब्ध आहेत.

याबाबत आपल्या इमारतीचे किंवा जागेचे, करयोग्य मुल्य अथवा करआकारणी, क्षेत्रफळ तसेच मालकी हक्क इ.बाबत आपली काही हरकत असल्यास कारणासह लेखी अर्जाद्वारे उपायुक्त (मालमत्ता कर) पनवेल महानगरपालिका तसेच Online हरकत नोंदविण्यासाठी ई-मेल pmc.tax2016@gmail.com यांच्याकडे यादी प्रसिद्ध केल्यापासून २१ दिवसांच्या आत किंवा तत्पूर्वी कार्यालयीन वेळेस वरील ठिकाणी हरकत नोंदवून पोचपावती घ्यावी.

वरील मुदतीत लेखी हरकत/ई-मेल वर हरकत अर्ज प्राप्त न झाल्यास सदर आकारणी आपणास मान्य आहे असे गृहीत धरुन करआकारणी प्रस्तावित करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

तसेच उपरोक्त प्रमाणे सुधारित करमुल्यांकना बाबत आपण हरकत न नोंदविल्यास अथवा सुनावणी हरकत नियमाला धरुन नसल्यास सुनावणी अंती सुधारित चालू मागणी व सर्व मालमत्तांची सन २०१९-२० पर्यंत वसूली व थकबाकी यांचे समयोजन करून सर्व मालमत्ता धारकांना सन २०२०-२१ करिता सुधारित देयक महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे प्रकरण ८ नियम ३०, ३९ व ४० शास्तीसह यानंतर बजाविण्यात येईल.

टिप : वरील प्रमाणे कुठल्याही मालमत्ता धारकांना/भोगवटा धारकांना हरकत नोंदवायची असल्यास सदर लेखी अर्जा / Online (Pdf Copy) सोबत पुढील नमूद दस्ताऐवज जोडणे आवश्यक आहे.

१) आक्षेप संबंधित मुद्दे निहाय आक्षेप अर्ज.
२) मालमत्ते संबंधात मालकी हक्कांचे दस्ताऐवजाची स्वसाक्षांकित प्रत. (मालमत्तेची नोंद मनपा रेकॉर्ड मध्ये नसल्यास)
३) सुधारित कर मुल्यांकन नोटीसची छायाप्रत.
४) यापूर्वी कर आकारणी झाली असल्यास मागील वर्षीचा कर भरणा केल्याची पावती.

संपर्क अधिकारी :-
१) वंदना गुळवे (सहा-आयुक्त)
२) सुनील मानकामे (विभाग प्रमुख-मालमत्ता कर विभाग)
भ्रमणध्वनी क्र. १८००-५३२०-३४०
फोन नं.०२२-२७४५८०४०/४१/४२
ईमेल : pmc.tax2016@gmail.com

सही/-
(सुधाकर देशमुख)
आयुक्त
पनवेल महानगरपालिका



सिडको
शहरांचे शिल्पकार

## जाहीर सूचना

**(भूखंड वाटपपत्र/करारनामा करणेबाबत)**

सिडको महामंडळाच्या भूमी व भूमापन विभागातर्फे साडेबारा टक्के योजने अंतर्गत खालील तपशीलानुसार संबंधित भूधारकांना भूखंडाचे वाटप करण्याची प्रशासकीय कार्यवाही करण्यात येत असून, खालील तपशीलानुसार संबंधितांना भूखंडाचे **करारनामा/वाटपपत्र** करणे प्रस्तावित आहे.

| अ. क्र. | गाव व संचिका क्र. | निवाडा क्र. | सर्व्हे क्र. | संपादित क्षेत्र | मंजूर पात्रता | करारनामा करण्यात येणाऱ्या भूखंडाची माहिती | करारनामा संबंधित भूधारक व त्यांच्या कायदेशीर वारसांची माहिती | संचिकेतील उपलब्ध माहिती व सद्यस्थितीनुसार संपादित जमिनीशी संबंधित न्यायालयीन दाव्यांची सद्यस्थिती |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **ता. पनवेल, जि. रायगड** | | | | | | | | |
| १ | तळोजा २२१ | तळोजा ३४५ | १५३/१२A-१<br>१५३/१A<br>१५३/१२A-२ | ०-१४-७<br>०-१५-५<br>०-१५-७ | ४०० चौ.मी. | भूखंड क्र.६, सेक्टर-१२, क्षेत्र ४०० चौ.मी. | **श्री. उद्धव शंकर पाटील** | निरंक |
| | | | **एकूण क्षेत्र** | ०-४५-९ | | | | |
| २ | गव्हाण १२३२ | ६९७ | २५३/२ | ०-१७-७ | एकूण मंजूर पात्रता १५० चौ.मी. | उलवे, सेक्टर-९, भूखंड क्र. १३९, क्षेत्र १५० चौ.मी. | मूळ भूधारक<br>कै. शिमग्या कमळ्या ऊर्फ कावळ्या ठाकूर (मयत) यांचे वारस<br>१. धर्मुबाई शिमग्या ठाकूर<br>२. श्री. सदाशिव शिमग्या ठाकूर<br>३. श्री. गणेश शिमग्या ठाकूर<br>४. श्रीमती जयश्री रामनाथ भगत<br>५. श्रीमती प्रमिला क्रीष्णा घरत<br>६. श्रीमती मनिषा संदेश ठाकूर<br>७. श्रीमती मेघा भगवान ठाकूर<br>८. कुमार क्रीष भगवान ठाकूर | निरंक |
| ३ | तळोजा ३८४ | ५६ | २३४/२ | ०-५१-९ | ४५० चौ.मी. पैकी १५० चौ.मी. | भूखंड क्र. ७, सेक्टर-४०, क्षेत्र १५० चौ.मी. | **हाजिमियाँ अहमदमियाँ पटेल व इतर** यांचे नावे जाहीर झाला आहे.<br>भूधारक **हजीरा अहमदमिया पटेल (मयत) यांचे वारस**<br>१)श्री. हाजीमिया अहमदमियो पटेल<br>२)श्री. अ. करीम अहमदमियो पटेल<br>३)श्रीमती मरीयाबीबी इब्राहीम पटेल<br>४)श्रीमती नुरबानू वासिम कूगळे<br>५)श्रीमती मुनिरा अ. कादीर फरीद<br>६)श्रीमती शबनूर इलास पटेल उर्फ शबनूर अहमदमियो पटेल<br>७)श्री. इब्राहीम सुभेदार,<br>८)श्री. म. हानीफ इब्राहीम सुभेदार<br>९)श्री. अ. रहेमान इब्राहिम सुभेदार<br>१०) श्रीमती साईदा इब्राहीम सुभेदार<br>११) श्रीमती रझीया इब्राहीम सुभेदार<br>१२) श्रीमती सुगरा इब्राहीम सुभेदार<br>हे वारस असून सदर वारसांपैकी<br>**१) श्री. हाजीमिया अहमदमियो पटेल**<br>**२) श्री. अ. करीम अहमदमियो पटेल**<br>**३) श्रीमती मरीयाबीबी इब्राहीम पटेल**<br>**४) श्रीमती नुरबानू वासिम कूगळे**<br>**५) श्रीमती मुनिरा अ. कादीर फरीद**<br>**६) श्रीमती शबनूर इलास पटेल उर्फ शबनूर अहमदमियो पटेल**<br>**७) श्री. इब्राहीम सुभेदार**<br>**८) श्री. अ. रहेमान इब्राहिम सुभेदार**<br>**९) श्रीमती साईदा इब्राहीम सुभेदार**<br>**१०) श्रीमती रयाझी इब्राहीम सुभेदार**<br>**११) श्रीमती सुगरा इब्राहीम सुभेदार**<br>यांनी हक्कसोड केला असून<br>**श्री. म. हानीफ इब्राहीम सुभेदार** यांचे लाभात भूखंडाचे वाटप करावयाचे आहे. | सह. दुय्यम निबंधक, वर्ग-३ पनवेल-१, दस्त क्र. ९९०५/२०२० हक्कसोडनुसार |
| ४ | न्हावे १६१ | १८६ | अ/७४<br>अ/२१८<br>अ/३५१<br>अ/५८२<br>ब/६<br><br>ब/१०<br><br>ब/११ | ०-१३-०<br>०-३२-०<br>०-१६-०<br>०-२७-८<br>०-१६-०<br>०-०१-०<br>०-१६-०<br>०-०१-०<br>०-०७-० | एकूण मंजूर पात्रता ११५० चौ.मी. | उलवे भूखंड क्र.- सी-१ डी, सेक्टर -८, क्षेत्र-७६६.६६ चौ. मी. | **मूळ भूधारक :-**<br>**कै. दत्तू नागू भोईर (मयत) यांचे वारस**<br>१. कमलाबाई भरत तांडेल<br>२. जयवंती भरत तांडेल | निरंक |

उपरोक्त नमूद केलेल्या संचिकेसंदर्भात संबंधितांनी नोंद घ्यावी की, संबंधित संचिकेबाबत न्यायालयात त्यांचे हक्क प्रस्थापित करणारा दावा/हरकती प्रलंबित आहेत. तसेच भूधारकाच्या नावाचा अथवा त्यांच्या कायदेशीर वारसांच्या नावाचा जाहीर सूचनेप्रमाणे प्रसिद्ध झालेल्या मजकूरात समावेश झालेला नसेल, अशा संबंधितांनी सदर जाहीर सूचना प्रसिद्ध झाल्यापासून ७ (सात) दिवसांच्या आत लेखी स्वरुपात अर्ज सादर करण्याच्या ठिकाणी अर्ज व पूरक कागदपत्रांसह निदर्शनास आणावी. सदर अर्जासह पूरक कागदपत्रांची तपासणी करुन करारनामा करण्याबाबत पुढील योग्य कार्यवाही करण्यात येणार असून, अपूर्ण माहितीसह कागदपत्रांच्या अर्जांची दखल घेण्यात येणार नाही याची संबंधितांनी नोंद घ्यावी, ही विनंती.

**अर्ज सादर करण्याचे ठिकाण :- मुख्य भूमी व भूमापन अधिकारी**
सिडको भवन, समस्या निवारण केंद्र, खिडकी क्र.१०, तळ मजला,
सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४.

**अति. मुख्य भूमी व भूमापन अधिकारी (रायगड)**

CIN - U99999 MH 1970 SGC-014574
www.cidco.maharashtra.gov.in

सिडको/जनसंपर्क/३०८/२०२०-२१